|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १३ अंक : ५० सोमवार दि. २२ डिसेंबर २०२५ ते रविवार दि. २८ डिसेंबर २०२५ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड

## दीडशेच्या उधरीवरून वाद पेटला दुकानदाराने ग्राहकाचा जीव घेतला

ठाणे : क्राईम रिपोर्टर

काही दुकानावर लिहलेले असते कि 'आज रोख उद्या उधार' याचा अर्थ कुणी उधारी मागू नये. आणि एका अर्थी ते खरेच आहे. कारण उधारीच्या पैशावरून अनेक ठिकाणी वाद झालेले आहेत आणि त्या वादातून काही लोकांचा जीवही गेलेला आहे. अशीच एक घटना ठाणे जिल्ह्याच्या कळमगाव येथे घडली आहे. उधारीवर र्षण दिले नाही म्हणून एका ग्राहकाने दुकानदाराला शिव्या घातल्या, त्याचा दुकानदाराला इतका राग आला कि रागाच्या भरात त्याने ग्राहकाची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला ...पान ६ वर

## जमिनीच्या वाटणीसाठी कृतघ्न मुलगा हट्टाला पेटला जन्मदात्या आई-वडिलांचाच निर्दयीपणे जीव घेतला

हुपरी (कोल्हापूर) : क्राईम रिपोर्टर





तरुण मुलगा हा त्याच्या आई वडिलांसाठी म्हातारपणाची काठी असते. त्याच भावनेतून त्यांनी मुलाला वाढवलेले असते. त्स्वता काबाड कष्ट करून हळ अपेष्टा सोसून त्याला वाढवलेले असते. त्याला शिक्षण देवून स्वताच्या पायावर उभे केलेले असते. त्यामुळे आई वडिलांच्या या उपकाराची जान ठेवून मुलाने म्हातारपणात आईवडिलांना आधार द्यायचा असतो. पण आजकाल माणूस खूप स्वार्थी बनलेला असल्याने ज्या आई वडिलांनी त्याला लहानाचे मोठे करून समाजात ताठ मानेने उभे केले तेच आई वडील उतारवयात त्याच्यासाठी अडचणीचे ठरू लागले आहेत त्यामुळे मुले आई वडिलांना एक तर वृद्धाश्रमात पाठवतात किंवा त्यांचा मानसिक छळ करून हलकीचे जीवन जगायला भाग पाडतात काही मुले तर त्याहीपेक्षा भयंकर विचार करून आईवडिलांचा जीव घ्यायलाही मागेपुढे पाहत नाहीत. समाजात अशा कृतघ्न मुलांमुळे पालक आणि मुले यांच्या नात्याला कलंक लागला आहे. याला कारण आहे. मुलांवर त्यांच्या लहानपणी चांगले संस्कार झालेले नसतात. शाळा क्लेज्मध्ये उच्च प्रतीचे शिक्षण तर मिळते पण संस्कार मिळत नसल्याने समाजात रक्ताच्या नात्यांमध्ये रक्ताचे पाट वाहू लागले आहेत. जमीन धन संपत्ती नात्यांपेक्षा मोठी ठरू लागली आहे. त्यामुळे भाऊ भावाचा, मुलगा, बहिण भावाची वैरीण ठरतेय. रक्ताच्या नात्याला कलंक लावणारी अशीच एक घटना कोल्हापूर जिल्ह्याच्या हुपरी मध्ये घडली आहे. या ठिकाणी अवघ्या अर्धा एकर जमिनीच्या तुकड्यासाठी एका कृतघ्न मुलाने आई वडिलांचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी मुलाला अटक केली आहे.

घराची वाटणी करण्याच्या कारणावरुन माथेफिरू मुलाने बांबूच्या दांडक्याने डोक्यावर प्रहार, विळ्याच्या पात्याने मान आणि काचेच्या तुकड्याने हाताच्या नसा कापून जन्मदात्या आई-वडिलांचा निर्घृण खून केला. नारायण गणपतराव भोसले (वय ८२), विजयमाला नारायण भोसले (७०) असे वयोवृद्ध दाम्पत्याची नावे आहेत. या प्रकरणी आरोपी सुनील नारायण भोसले (वय ४८, रा.हुपरी, ता.हातकणंगले) याला पोलिसांनी अटक केली आहे. या घटनेमुळे हुपरीसह जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.पोलिस व घटनास्थळावरून मिळालेली माहिती अशी, हुपरीतील महावीरनगर येथे नारायण भोसले व त्यांच्या पत्नी विजयमाला हे दोघेही राहत होते. त्यांचे मुलगे चंद्रकांत व संजय हे व्यवसायानिमित्त बाहेरगावी राहतात तर सुनिल हा घरासमोरील पत्र्याच्या शेडमध्ये एकटाच राहतो. चंद्रकांत व संजय हे दोघेही आई-वडीलांना भेटायला अधूनमधून गावी येत असत.दरम्यान, सुनिल हा नेहमी किरकोळ कारणावरून भांडण काढून आई-वडीलांना शिवीगाळ करून मारहाण करीत असे. महिन्यापूर्वीच त्याने काठीने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली होती. मात्र, माफी मागितल्याने त्याच्याविरूद्ध त्यांनी तक्रार दिली नव्हती.गुरूवारी (१९) रात्री नारायण हे पहिल्या खोलीत तर विजयमाला या मागील खोलीत झोपल्या होत्या. पहाटे दोघेही साखरझोपेत असतानाच सुनिलने बांबूच्या दांडक्याने वडीलांच्या डोक्यावर प्रहार केला. त्यानंतर काचेच्या तुकड्याने हाताच्या नसा कापल्या त्यानंतर मागील खोलीत झोपलेल्या आईच्या डोक्यावरही दांडक्याने प्रहार केला, विळ्याने गळा चिरला व उजव्या हाताच्या मनगटाजवळची नस काचेने कापली. त्यामुळे दोघेही रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. मागील खोलीसह संडास बाथरूमच्या भिंतीवर रक्ताचे डाग पडले होते.दरम्यान, जिल्हा पोलिस प्रमुख योगेशकुमार गुप्ता, उपअधिक्षक धीरजकुमार, ...पान ६ वर

## झारखंडमधील वाद नालासोपाऱ्यात पेटला मुलाने बापाच्या अपमानाचा बदला घेतला



नालासोपारा : क्राईम रिपोर्टर

वडिलांना झालेली मारहाण कोणत्याही मुलाला सहन होत नाही. तो कधीना कधी बदल घेतो. अशीच एक घटना वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. मुळचा झारखंडचा रहिवाशी असलेल्या व सध्या गोराई पाडा येथे राहणाऱ्या कुशनु हेम्ब्रोम याच्या वडिलांना झारखंड मधील त्याच्या गावी मंदिराच्या वर्गणी वरून मारहाण करण्यात आली होती. याच हत्येचा बदला घेण्यासाठी कुशनु याने त्याच्या वडिलांना मारहाण करणाऱ्या टाटा हेम्ब्रोम याच्या हत्येचा कट रचला आणि त्याची हत्या करून झारखंडमध्ये झालेल्या अपमानाचा नालासोपाऱ्यात बदला घेतला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

मागील गुरुवारी वालीव पोलिसांना गोराईपाडा येथील मुकुंद नगर मधील कीर्ती इंडस्ट्रीजवळ एक मृतदेह सापडला होता. कुणीतरी कोयत्याने एका इसमाची हत्या केली होती. या प्रकरणी वालीव पोलिसांनी गुन्हा दाखल करून चौकशी सुरु केली आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे गोराईपाडा येथे राहणाऱ्या कुशनु हेम्ब्रोम याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने आपला गुन्हा कबुल करताना सांगितले की झारखंड येथील चक्रधरपूर या आपल्या गावी गावदेवी मंदिराच्या वर्गणी वरून त्याच्या वडिलांशी टाटा हेम्ब्रोम व त्याच्या वडिलांचा वाद झाला होता. ...पान २ वर




## बापावरच्या रागाची मुलीला शिक्षा दिली अत्याचार करून निर्घृणपणे हत्या केली

नाशिक : क्राईम रिपोर्टर



सुडाने पेटलेला माणूस कोणत्या थराला जाईल याचा नेम नसतो. त्यामुळे अशा माणसापासून आपल्याला किंवा आपल्या कुटुंबातील लोकांना भविष्यात कधीतरी धोका होईल हे लक्षात ठेवून माणसाने सावधगिरी बाळगायची असते. पण काही लोक एखाद्याशी भांडण झाल्यावर बेसावध राहतात आणि अशा बेसावध माणसाच्या बाबतीत पुढे काहीही घडू शकते. मालेगावच्या डोंगराळे गावात अशीच एक संतापजनक घटना घडली आहे. या ठिकाणी एका छायाचित्रकाराचे गावातीलच एका तरुणाशी भांडण झाले होते याच भांडणाचा राग मनात धरून तो तरुण त्या छायाचित्रकाराला धडा शिकवण्याच्या विचारात होता. त्यासाठी त्याच्या डोक्यात सैतानी सुडाचे विचारचक्र सुरु झाले आणि त्याने छायाचित्रकाराच्या मुलीचे अपहरण करून तिच्यावर अत्याचार केला. तसेच आपले पाप उघडकीस येवू नये म्हणून तिची हत्या केली. या घटनेमुळे संपूर्ण नाशिक जिल्ह्यात संतापाचे वातावरण असून पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

मालेगाव तालुक्यात डोंगराळे नावाचे गाव आहे. मालेगाव-कुसुंबा रोडवर वसलेले हे छोटेसे गाव. डोंगराच्या कुशीत ...पान २ वर

## विम्याच्या पैशांसाठी स्वत:च्या मृत्यूचा बनाव केला फायनान्स कंपनीचा वसुली एजंट गजाआड झाला



औसा : शिवाजी मोरे

विम्याचे पैसे हडपण्यासाठी स्वतःच्याच मृत्यूचा बनाव करणाऱ्यांना हे ठावूक नसते कि कोणताही गुन्हा परफेक्ट क्राईम नसतो. त्याचे धागेदोरे कुठेना कुठे मागे राहिलेले असतात आणि त्यावरूनच पोलीस अशा शातीर गुन्हेगारांच्या मुसक्या आवळतात. लातूरच्या औसामध्ये विम्याचे पैसे हडपण्यासाठी फायनान्स कंपनीचा कर्जबाजारी वसुली एजंट गणेश चव्हाण याने स्वतःच्याच मृत्यूचा बनाव केला होता. त्यासाठी एका निरपराध माणसाचा जीव घेवून तोच गणेश चव्हाण असल्याचे भासवण्याचा प्रयत्न केला होता, पण पोलिसांनी त्याचा हा बनाव हाणून पाडला आणि त्याला अटक केली.



आरोपी गणेश चव्हाण



लातूर जिल्ह्यातील औसा पोलीस ठाणे हद्दीत असलेल्या मौजे वानवडा गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी रात्री साडेअकरा वाजल्यापासून एक कार भीषण आगीत जळत होती. दरम्यान औसा वानवडा असा प्रवास करणाऱ्या काही दक्ष नागरिकांनी ११२ हेल्पलाइन वर कॉल करून सदरील घटनेची माहिती दिली त्या आधारे ...पान २ वर

## चारित्र्याच्या संशयाने पती झाला बेजार दारुच्या नशेत त्याने पत्नीला केले ठार

बागलकोट (कर्नाटक) : क्राईम रिपोर्टर



संशयी माणूस कधी कधी स्वतःचेच नुकसान करून घेतो, अशातच जर त्याला दारूचे व्यसन असेल तर तो पत्नीला अधिकच छळतो. अशावेळी त्याच्या कुटुंबातील लोकांनी त्याची समजूत काढायची असते, पण कधी कधी कुटुंबातील लोकच आगीत तेल ओततात, त्यामुळे आग अधिक भडकते. बागलकोट जिल्ह्याच्या तेरदाळ गावात राहणाऱ्या भारतेश व लक्ष्मीचा सुखाचा संसार सुरु होता, पण भारतेशला दारूचे व्यसन लागल्या पासून तो बिघडला आणि पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेवू लागला. त्यातच लक्ष्मीने माहेरावरून हुंडा आणला नव्हता. त्यामुळे सासू सासरे नाराज होते, ते ही लक्ष्मीला त्रास द्यायचे आणि आपल्या मुलाला लक्ष्मीविरूद्ध सतत चिथावणी द्यायचे. त्यामुळेच भारतेशने चिडून पत्नीची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

कर्नाटकातील बागलकोट जिल्हयातील तेरदाळ हे गाव तसे सधन गाव म्हणून ओळखले जाते. येथे जैन समाजातील लोकांची संख्या जास्त असल्याने बऱ्याच जैन आणि लिंगायत समाजातील लोकांची शेती ही मोठया प्रमाणात आहे. धुमट गल्लीत पारिसा ...पान ६ वर

## रोजच्या भांडणाचा दुखद शेवट झाला दारुड्या पतीनेच पत्नीचा खून केला



विरार : क्राईम रिपोर्टर

दारुडा माणूस संपूर्ण कुटुंबासाठी डोकेदुखी असतो. कारण एकतर तो स्वतः कामधंदा करीत नाही. आई-वडिलांच्या किंवा पत्नीच्या जीवावर बसून खात असतो. शिवाय दारू पिवून घरी आल्यावर घरातल्या लोकांना त्रास देत असतो. त्यामुळे अशा माणसाला घरातले लोक कंटाळलेले असतात. त्यामुळे खरेतर अशा माणसाचा कुटुंबातील लोकांनी वेळीच बंदोबस्त करायला हवा अन्यथा दारुड्या माणसाच्या हातून काहीही घडू शकते. कारण नशेत आपण काय करतोय याचे त्याला भान नसते. खास करून अशा माणसाचा सर्वाधिक त्रास त्याच्या पत्नींला होत असतो. पण त्याही परिस्थितीत पत्नी सर्व सहन करीत असते. खरे तर तिचा हा सोशिकपणाच तिच्यासाठी काळ ठरतो आणि तिच्या आयुष्याची दोरी तोडतो. विरारच्या चंदनसार येथे एका दारुड्या पतीने पत्नीसोबत झालेल्या भांडणानंतर पत्नीची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

विरार पूर्वेकडील चंदनसार परिसरातील साईधाम अपार्टमेंटमध्ये राहणार्या सपना पवार या महिलेला तिच्याच पतीने मारहाण करून खून केल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी आरोपी ...पान ६ वर

## जमिनीच्या वाटणीचा वाद प्राणावर बेतला जन्मदात्या बापानेच मुलाचा जीव घेतला

जळगाव : क्राईम रिपोर्टर



मयत सचिन

पैसा आणि संपत्ती हेच माणसाचे सर्वस्व बनलेले आहे. आणि आजकाल माणूस फक्त स्वतःचाच विचार करीत असल्याने त्याला नात्या गोत्याची फारशी फिकीर नसते. परिणामी रक्ताच्या नात्यात् सुद्धा रक्ताचे पाट वाहतात आणि त्यातून मुलगा बापाचा, भाऊ भावाच्या जीवावर उठतो. असाच काहीसा प्रकार जळगाव जिल्ह्यातील कुसुंबा गावात घडला जमिनीची वाटणी करण्यासाठी बापाला त्रास देणाऱ्या एका रिक्षा चालकाला जन्मदात्या बापानेच ठार मारले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी बापाला अटक केली आहे.



आरोपी रवींद्र

राबराब राबून पुर्वज शेती व इतर जंगम मालमत्ता तयार करतात. आपल्या पुढील पिढीला ती मालमत्ता मिळावी आणि त्यांचे आयुष्य सुखकर व्हावे हा त्यामागचा प्रामाणिक हेतू असतो. मात्र तीच मालमत्ता कधीकधी येणाऱ्या पिढीसाठी वादाचे कारण देखील बनते. प्रसंगी एखादी अप्रिय घटना देखील या मालमत्तेच्या वादातून होते. त्याऐवजी मुलांना चांगले शिक्षण देऊन त्यांना स्वत:च्या पायावर उभे ...पान ६ वर

## जावयानेच साधला अचूक नेम मुकबधीर सासऱ्याचा केला गेम



छत्रपती संभाजीनगर : क्राईम रिपोर्टर

लग्नानंतर केवळ वाढू वरच एकत्र येतात असे नाही तर दोघांची कुटुंब सुद्धा एकत्र येवून त्यांचे नाते जुळलेले असते. त्यामुळे ही नाती जपायची असतात, पण सर्वांनाच ही नाती जपता येत नाहीत. त्यामुळे नात्यात दुरावा येतो आणि वाद विवाद वाढतात आणि अशा वादात एखाद्याचा जीवही जातो. संभाजीनगर जिल्ह्यातील येथे अशाच वादातून एका इसमाने नात्याने सासरा असलेल्या पण व्यासनाच्या आहरी गेलेल्या मुकबधिराची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी आणि त्याच्या साथीदाराला अटक केली असून पुढील तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

पैठण तालुक्यातील पाटेगाव येथे गोदावरी नदीत पुलाखाली सापडलेल्या अनोळखी मृतदेहाची ओळखत पटवत स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अवघ्या ४८ तासात या खूनाचा छडा लावला. मूकबधिर असलेल्या कृष्णा पंढरीनाथ धनवडे (रा.गदेवाडी, जि. बुलढाणा) या तरुणाचा पूर्वनियोजित कट रचून गळा आवळून खून करण्यात आल्याचे तपासात उघड झाले आहे. या प्रकरणी भाचे-जावयासह दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. यात एका विधीसंघर्ष ...पान ६ वर

22 TO 28 DECEMBER 2025 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 12/20/2025 8:16 PM Page 1



पान १ वरून...

## झारखंडमधील वाद नालासोपाऱ्यात पेटला ...

या वादात त्या दोन बाप बेट्यांनी कुशनुच्या वडिलांना मारहाण केली होती. या बाबतची माहिती जेंव्हा त्याच्या वडिलांनी कुशनुला सांगितली, तेंव्हा तो संतप्त झाला आणि त्याने तीन महिन्यापूर्वीच टाटा हेम्ब्रोमचा गेम करण्याचा कट रचला. त्यासाठी एक धारदार कोयता खरेदी केला. बुधवारी कुशनु याने टाटा हेम्ब्रोमला दारू पिण्यासाठी आपल्या घरी बोलावले, त्यानुसार टाटा दारू पिण्यासाठी कुशनुच्या घरी गेला, तिथे दोघे भरपूर दारू प्यायले, त्यानंतर कुशनु टाटाला कीर्ती इंडस्ट्री जवळ घेवून गेला तिथे दोघांमध्ये वाद झाला. या वादानंतर कुशनु याने आपल्याकडेच्या कोयत्याने टाटा हेम्ब्रोम याची हत्या केली. सदरची कामगिरी पोलीस आयुक्त निकेत कौशिक, अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) संदीप डोईफोडे, सहा. पोलीस आयुक्त मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट दोनचे पोलीस निरीक्षक अविराज कुराडे, सहा. पोलीस निरीक्षक सोपान पाटील, पोउपनिरी संतोष घाडगे आणि अजित गिते, सहाफौज संजय नवले, मुकेश पवार, रविंद्र पवार, मनोज मोरे, चंदन मोरे, पोहवा प्रफुल्ल पाटील, सचिन पाटील, जगदिश गोवारी, राहूल कर्पे, दिलदार शेख, दादा आडके, अनिल साबळे, अक्षय बांगर, मसुब रामेश्वर केकान तसेच सायबर शाखेचे सफौज संतोष चव्हाण यांनी केली आहे.

## बापावरच्या रागाची मुलीला शिक्षा...

असल्याने या गावाला डोंगराळे असे नाव पडले आहे. डोंगराळे गाव अतिशय शांत. शेती व इतर व्यवसाय करून या गांवातील लोक आपला उदरनिर्वाह करतात. या गावातील लोक गुण्यागोविंदाने आणि सामंजस्याने रहात असल्याने भानगडी हा विषयच गावाला माहित नाही. अशा या शांतप्रिय गावामध्ये अतिशय संतापजनक घटना घडली. या गावातील एका २४ वर्षाच्या तरूणाने अवघ्या चार वर्षाच्या चिमुरडीवर पाशवी बलात्कार करून तिच्या डोक्यावर व तोंडावर दगडाने मारून तिचा निघृणपणे खून केला आणि तिचा मृतदेह गावातील टॉवरजवळील झुडुपात फेकून दिल्याने या तरूणाविषयी तीव्र संताप उमटत आहे. राज्यात या घटनेने खळबळ माजली आहे. डोंगराळे गावात एक फोटोग्राफर रहातो. फोटोग्राफीचा व्यवसाय करून तो आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. पत्नी व एक चार वर्षाची मुलगी असा त्याचा परिवार आहे. अतिशय सुखी-समाधानात त्याचा 'संसार सुरू होता. एकुलती एक असणाऱ्या मुलीला हातावरच्या फोडाप्रमाणे हे दाम्पत्य जपत होते. ती लाडाकोडात वाढत होती. जशी ती आपल्या आई-वडीलांची लाडकी होती, तशी ती गल्लीमध्ये सर्वाची लाडकी होती. दिसायला गोंडस असल्याने सर्वजण तिच्याशी लडिवाळपणे वागायचे. तीही बोलकी होती. आपल्या बोबड्या बोलण्याने सर्वाचे मन जिंकत असे. या डोंगराळे गावामध्ये शेखर उर्फ विजय संजय खैरनार (वय २४) हा तरूण त्याच्या आजीसोबत रहातो. मोलमजुरी करून जीवन जगतो. आजीशिवाय त्याचे कोणीही नातेवाईक नाहीत. आजी कामाच्या निमित्ताने बाहेरगावी वा कुठेही गेली की तोच एकटा घरात रहात असे. त्याचा स्वभाव मात्र भांडखोर आणि चिडचिडा होता. एखाद्याशी भांडण झाले की त्याचा राग डोक्यात दीर्घकाळ रहात असे. काही दिवसांपूर्वी तो फोटोग्राफर आणि विजयचे भांडण झाले होते. त्या भांडणाचा राग डोक्यात घालून तो वावरत होता. त्याच्या मनात या गोष्टीचा बदला घेण्याची भावना तीव्र निर्माण झाली होती. तो संधीची वाट पहात होता. रविवार दि. १६ नोव्हेंबर २०२५ हा दिवस. त्यादिवशी फोटोग्राफर हा काही कामानिमित्ताने बाहेरगावी गेला होता. हे विजयला माहिती होते. तो गावाला गेल्याचे विजयच्या लक्षात आले होते. त्याची आजीही घरात नव्हती. तीही बाहेरगावी गेली होती. विजय घरात एकटाच होता. घराच्या पायरीवर बसून तो जगदीशचा बदला कसा घ्यायचा, याचा विचार करत होता. इकडे जगदीशच्या घरात त्याची पत्नी कामात मग्न होती, तर चिमुरडी मुलगी अंगणात समवयीन लहान मुलांसमवेत खेळत होती. विजयने ते पाहिले आणि तो त्या मुलीजवळ आला. 'चल तुला कॅडबरी देतो' असे तो तिला म्हणाला. लहान मुलांना कॅडबरी प्रिय. हा काका आपल्याला कॅडबरी देणार म्हटल्यावर तीही त्याच्याजवळ आली. तेंव्हा त्याने तिला उचलून आपल्या घरी आणले. घरात जाताच विजयने दरवाजा लावला. ती चिमुरडी मात्र आपल्याला काका कॅडबरी देणार या आनंदात तिथे उभी होती. घराचा दरवाजा बंद करून विजयने त्या चिमुरडीवर राक्षसी लैंगिक अत्याचार केला. तिच्या वयाचे त्याला भान नव्हते. फक्त डोक्यात होती बदल्याची आग! काही दिवसांपूर्वी हिच्या बापाबरोबर आपले भांडण झाले. त्याने अपमान केला, त्याला चांगलाच धडा शिकवायचा हाच विचार त्याच्या डोक्यात होता. तिच्यावर त्याने बलात्कार करण्यास सुरूवात केलीः ती वेदनेने रडत होती. ती रक्तबंबाळ झाली, पण त्याला दया आली नाही.

आपला कार्यभार आटोपल्यावर त्या नराधमाने घरामागे असलेल्या टॉवरजवळ असलेल्या झुडुपात तो तिला घेवून गेला. अत्यंत क्रुरपणे दगडाने ठेचून व गळा दाबून त्याने तिला ठार मारले. तिचा चेहरा व डोके दगडाने ठेचल्याने ती रक्तबंबाळ होवून तिथेच पडली. तिला तिथेच सोडून हा नराधम घरी पळून आला. तोपर्यत घरात काम करत असलेल्या त्या मुलीच्या आईला बाहेर काय झाले याची कल्पना नव्हती. आपली चिमुरडी मुलांसमवेत खेळत असेल असे समजून ती काम करत होती. दुपारी चार वाजता काम आटोपल्यावर ती बाहेर तिला बोलावण्यासाठी आली, तेव्हा अंगणात खेळत असलेली चिमुरडी तिला दिसली नाही. शेजारी-पाजारी गेली असेल म्हणून तिने तिथे चौकशी केली, पण ती कुठेच दिसून येईना. आता मात्र तिचे धाबे दणाणले. सगळीकडे पळापळ करत तिने मुलीचा शोध घेतला. एव्हाना साऱ्या गावाला समजले की ती चिमुकली कुठेतरी गायब झाली आहे. अख्खा गाव त्या बालिकेला शोधू लागला, पण तिचा काही पत्ता लागला नाही. बाहेर सगळा गाव तिला शोधत आहे नराधम विजयला समजले तेंव्हा आपण काहीच केले नाही असा आव आणत, आपल्यावर कुणी संशय घेवू नये म्हणून तोही शोध मोहिमेत सहभागी झाला. तिचा फोटो त्याने घरच्यांकडून मागून घेतला. तिला शोधण्याचे त्याने नाटक केले. तिच्या पालकांनी तिच्यासोबत खेळणाऱ्या मुलांकडे चौकशी केली असता त्या मुलांनी विजय खैरणार कॅडबरी देतो म्हणून तिला घेवून गेल्याचे सांगितले. तेंव्हा तिच्या आई-वडीलांनी त्याच्या घरात जावून त्याला विचारले. त्याने सांगितले की, मी तिला कॅडबरी देवून दुकानाच्या येथेच सोडले होते. त्यानंतर तो पुन्हा त्यांच्यासमवेत तिचा शोध घेण्यास बाहेर पडला. दरम्यान सर्वजण या चिमुरडीचा शोध घेत-घेत विजयच्या घराच्या पाठीमागे असलेल्या टॉवरजवळ आले. तेंव्हा त्या लोकांना टॉवरजवळ असलेल्या झुडुपात यज्ञाचा भयानक अवस्थेतील मृतदेह मिळून आला. तिचे डोके व तोंड दगडाने ठेचले होते. ती रक्ताने माखून गेली होती. तिचा भयंकर अवस्थेतील मृतदेह पाहून लोकांच्या मनात संतापाची लाट उसळली.

दरम्यान या घटनेची खबर मालेगाव तालुका पोलिसांना मिळताच अप्पर पोलीस अधीक्षक तेजबीरसिंग संधू, पोलीस उपअधीक्षक यशवंत बाविस्कर, पोलीस निरीक्षक प्रितम चौधरी, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रिती सावंजी, शिरसाठ, उपनिरीक्षक दामोदर काळे आदींनी डोंगराळे गाव गाठले. 'पोलिसांनी मृतदेहाचा आणि घटनास्थळाचा पंचनामा केला आणि मृतदेह विच्छेदनासाठी नाशिकला पाठवला. दरम्यान या चिमुरडीला शेवटी कोण भेटले याची चौकशी पोलिसांनी केली. या चिमुरडीसोबत खेळणाऱ्या मुलांकडूनही पोलिसांनी माहिती घेतली असता विजय उर्फ शेखर संजय खैरणार या नराधमाचे नाव पुढे आले. पोलिसांनी त्याचे घर गाठले. घराची पाहणी केली असता घराच्या भिंतीवर रक्ताचे डाग पडलेले पोलिसांना दिसले, तेंव्हा पोलिसांची खात्री पटली की चिमुरडीला क्रूरपणे ठार मारणारा हाच नराधम विजय आहे. पोलिसांनी लगेच त्याच्या मुसक्या आवळल्या. दरम्यान हे क्रूर कृत्य विजयने केल्याचे समजताच गावकरी संतापले. त्याला आमच्या ताब्यात द्या.आम्ही त्याला फाशी देतो, अशी मागणी करू लागले. तेंव्हा पोलिसांनी परिस्थिती हाताळून जमावाला शांत केले. त्यानंतर विजयला मालेगावी पोलीस ठाण्यात आणले. तेथे त्याच्याकडे चौकशी. केली असता त्याने आपणच हा गुन्हा केल्याचे सांगितले.

मुलीच्या वडीलांसोबत झालेल्या भांडणाचा बदला घेण्यासाठी विजयने मुलीचा क्रूरपणे अत्याचार करून खून केला होता. मालेगाव तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा रजि.नं. ८३९/२०२५ नुसार विजय उर्फ शेखर संजय खैरणार रा. डोंगराळे, ता. मालेगाव याच्याविरोधात बी.एन.एस. कलम १०३ (१), ६६ सह बालकाचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ९६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपअधीक्षक यशवंत बाविस्कर यांच्याकडे सोपवण्यात आला. या घटनेबाबत सगळीकडे संताप व्यक्त केला जात आहे. घटनेच्या निषेधार्थ गावकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन केले. अनेक पक्ष व संस्था, संघटनांनी या नराधमाला फाशी द्या असे निवेदन प्रशासन व पोलिसांना सादर केले. शुक्रवार दि. २१ नोव्हेंबर २०२५ रोजी मालेगाव शहरात प्रचंड मोर्चा काढण्यात आला. त्यात बालिका, तरूणी व महिलांचा मोठा सहभाग होता. मोर्चा संपल्यावर काही संतप्त झालेल्या मोर्चेकऱ्यांनी मालेगाव कोर्टात घुसून संताप व्यक्त केला. पोलिसांनी परिस्थिती योग्य पद्धतीने हाताळून शांतता प्रस्थापित केले. शालेय मंत्री दादा भुसे, ना. गिरीष महाजन, मराठा नेते मनोज जरांगे, ज्योतीताई वाघमारे, रूपालीताई चाकणकर, आदीजणांनी डोंगराळे गावाला भेट देवून चिमुरडीला न्याय मिळवून देवू असे आश्वासन दिले. फास्ट ट्रॅकमध्ये खटला चालवून आरोपीला लवकरात लवकर फाशी द्यावी अशी मागणी चिमुरडीच्या पालकांनी व गावकऱ्यांनी केली आहे.

## विम्याच्या पैशांसाठी स्वतःच्या मृत्यूचा...

गस्तीवर असलेल्या औसा पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी वानवडा रस्त्याकडे धाव घेतली. रात्रीच्या गस्तीवर असलेल्या पोलिसांनी घटनास्थळ गाठुन घटनेची प्राथमिक माहिती घेत वरिष्ठांना खबर दिली. तात्काळ वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी अग्निशमन दल कार्यालयाशी संपर्क करून घटनेची माहिती दिली. तात्काळ अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी आपल्या वाहनासह दाखल झाले. काही तासातच अग्निशमन दलाने पेटलेली कारची आग आटोक्यात आणली. घटनास्थळावर बरीच गर्दी झाली होती. सदरील कारमध्ये अचानक बिगड झाल्यामुळे कोणीतरी येथे सोडून गेले असावे आणि त्या कारच्या वायरिंग मध्ये बिघाड होऊन अचानक पेट घेतली असावी असा अंदाज बांधण्यात येत होता. तर दुसरीकडे थांबलेल्या कारला अचानक कोणीतरी आग लावली आणि ही कार आगीत जाळून खाक झाली असावी असा अंदाज तर्क उपस्थित लोकांकडून लावण्यात येत होता. अग्निशमन दलाने आग विझवण्यात यश मिळवले असले तरी आगीत खाक झालेल्या कारच्या लोखंडी चेसी व पत्र्यातून गरम झळा बाहेर पडत होत्या. त्यामुळे कार जवळ जाण्यास कोणी तयार होत नव्हते. काही काळाने अग्निशमन दलाच्या बंबाने पाणी टाकून कर थंड केली. दरम्यान कार च्या बाबतीत नेमका काय प्रकार घडला असावा याचे गुढ उकडण्यासाठी पोलिसांनी कारचा ताबा घेतला. तेव्हा कारच्या ड्रायव्हर सीटवर एक जळून खाक झालेला सांगाडा पोलिसांना दिसला. ते पाहून पोलिसांना हा भयंकर प्रकार वाटला त्यांनी सदरील घटनेची माहिती वरिष्ठांना दिली.

घटनेची माहिती मिळतात औसा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रेवनाथ डमाळे यांनी आपल्या पोलीस कर्मचाऱ्यासह घटनास्थळाकडे धाव घेतली. औसा शहरापासून जवळच असलेल्या वानवडा रस्त्यावर एका कारमध्ये जळालेला मृतदेह आढळून आल्याची वार्ता पोलीस दलात वाऱ्यासारखी पसरली. दरम्यान घटनास्थळावर औसा उपविभागीय पोलीस अधिकारी कुमार चौधरी, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. दरम्यान घटनास्थळावर लातूर अप्पर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांनी भेट देऊन घटनेची प्राथमिक माहिती घेतली. औसा पोलीस ठाण्यांच्या कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना देऊन पंचनामा करण्याचे आदेश. तसेच सर्वच पोलीस ठाण्यांना समांतर तपासाचे आदेश दिले. पोलिसांनी पंचनामा सुरुवात केली. कारच्या ड्रायव्हर सीटवर अंदाजे पाच ते सव्वा पाच फूट उंचीचा सांगाडा पोलिसांना दिसला. या सांगाड्याच्या जवळ एक हातात वापरण्यात येत असलेले कडेही आढळून आले. तसेच गाडीच्या जवळ एक देशी दारूची बाटली ही आढळून आली. पोलिसांनी घटनास्थळा वरून आवश्यक ती माहिती हस्तगत केली. तसेच घटनास्थळावरच वैद्यकीय अधिकाऱ्यांना बोलवून सदरील हाडाच्या सांगाड्याचा पोस्टमार्टम पंचा समक्ष करण्यात आले. तसेच मयताची ओळख पटवण्यासाठी डीएनए सॅम्पल काढून ठेवण्यात आले आहेत.औसा पोलीस ठाण्यात आकसमात मृत्यू क्रमांक ७२/२०२५ कलम १९४ बीएनएस प्रमाणे दाखल करण्यात आला. पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी कुमार चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाचे सर्व सुत्र औसा पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक रेवनाथ डमाळे यांच्या हाती देण्यात आले.

दरम्यान घटनास्थळावर हजर असलेल्या स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर व त्यांच्या टीमने जळीत हत्याकांड घडलेल्या कारच्या आजूबाजू सारा परिसर पिंजून काढण्यास सुरुवात केली. तेव्हा जळीत कार पासूनच काही अंतरावर चिकनचे














तुकडे व दारूच्या बाटली दिसून आली. यावरून पोलिसांचा संशय बळावला जळीत हत्याकांडाचा प्रकार हा घातपात असल्याचा प्राथमिक संशय पोलिसाच्या वतीने वर्तवण्यात आला. सर्वप्रथम पोलिसांनी सदरील जाळीत कर कोणाच्या नावे आहे याचा माग काढण्यास सुरुवात केली. तेव्हा ही कार बळीराम गंगाराम राठोड (रा. औसा तांडा, तालुका औसा जिल्हा लातूर) यांची असल्याची माहिती मिळाली. मात्र त्यांच्याकडे या अनुषंगाने अधिक चौकशी केली असता आपली गाडी आपला मेहुना गणेश गोपीनाथ चव्हाण (रा. विठ्ठल नगर, औसा) हा वापरत असल्याची माहिती कळाली. यावरून पोलिसांनी तात्काळ घटनेचे गांभीर्य ओळखून गणेश गोपीनाथ चव्हाण राहत असलेल्या भागात पोलिसांचे पथक दाखल झाले. त्यांनी गणेश चव्हाण याचा घराचा शोध घेऊन त्याच्या नातेवाईकाकडून आधिक माहिती जाणून घेतली. तेव्हा १३ डिसेंबर रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास गणेश हा घरातून बाहेर पडला असून तो त्याच्या मित्राकडे लॅपटॉप देण्यासाठी जात असल्याची माहिती गणेशच्या पत्नीने पोलिसांना दिली. अचानक घरी आलेले पोलिसांना पाहून गणेश चव्हाण याची कुटुंबीय चिंतेत पडले. त्यांनी पोलिसकडे अधिक माहिती विचारली असता सदरील कार ही जळाली असून त्याच्यामध्ये एक मृतदेह आढळून आला आहे अशी माहिती पोलिसांनी गणेश चव्हाण यांच्या कुटुंबीयांना दिली. तात्काळ गणेश चव्हाण यांच्या कुटुंबीयांनी घटनास्थळी कडे धाव घेतली. तेव्हा पोलिसांनी त्यांना घटनास्थळावर मिळून आलेले हातातील कडे दाखवले त्यावेळेस गणेश चव्हाण यांच्या कुटुंबीयांनी त्या कड्यावरून गणेश चव्हाण याची ओळख पटवली. सदरील गाडी गणेश चव्हाण वापरत असून तसेच त्याच्या हातातील कडे जळीत गाडीत आढळून आल्यावरून गणेश चव्हाण यांना कोणीतरी जाळून मारला असल्याचा अंदाज नातेवाईकांनी पोलीसाकडे व्यक्त केला.

दरम्यान पोलिसांनी गणेश चव्हाण वापरत असलेल्या मोबाईल नंबर बाबत अधिक माहिती घेतली असता गणेश चव्हाण हा दोन वेगवेगळ्या क्रमांकाचे मोबाईल नंबर वापरत असल्याची माहिती पोलिसांच्या हाती आली. तसेच तो एका खाजगी फायनान्स कंपनीचे काम करत असल्याची ही माहिती समोर आली. तो खाजगी फायनान्स कंपनीत वसुली अधिकारी काम करत असल्यामुळे त्याचे अनेकांसोबत वाद किंवा दुश्मनी असल्याचेही त्यांच्या नातेवाईकांनी पोलीसांना सांगितली. त्यावरून पोलिसांनी तपासाची दिशा ठरवून तपास करण्यास सुरुवात केली. सर्वप्रथम पोलिसांनी गणेश चव्हाण वापरत असलेले मोबाईल क्रमांकांची माहिती घेण्यास सुरुवात केली. सध्या स्थितीत दोन्हीही मोबाईल क्रमांक बंद असल्याचे पोलिसांच्या निर्दशनास आले. बहुतेक गणेश चव्हाण याचा कोणीतरी घातपात करू त्याचे मोबाईल कोणीतरी हिसकून नेले असावे का या दिशेने पोलिसांनी तपास करण्यास सुरुवात केली. गणेश चव्हाण वापरत असलेल्या दोन्हीही मोबाईल क्रमांकाचा डाटा व कॉल हिस्टरी काढण्यास सुरुवात केली. त्याचा सीडीआर मागवण्यात आला. तेव्हा गणेश चव्हाण वापरत असलेल्या मोबाईलवरून एका विशिष्ट नंबरला जास्त दिवस संभाषण झाले असल्याची माहिती पोलिसांच्या हाती लागली. यावरून पोलिसांनी तात्काळ ज्या नंबरवर गणेश चव्हाण यांनी जास्त वेळा संपर्क साधला आहे त्या नंबरची माहिती मागवली. तेव्हा तो नंबर एक महिला वापरत असल्याची माहिती समोर आली. यावरून पोलिसांनी हा जळीत हत्याकांड बहुतेक अनैतिक संबंधातून झाला असावा का ? या दृष्टीने तपासाची दिशा ठरवली. गणेश चव्हाण यांनी अधिक काळ ज्या नंबर वर संभाषण केले आहे त्या नंबर वापरणाऱ्या महिलेला ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली. तेव्हा तिने पोलिसांना असमाधानकारक उत्तरे दिली. तिला विश्र्वासात घेऊन अधिक चौकशी केली असता तिने गणेश चव्हाण हा माझा जवळचा मित्र असल्याचे सांगून आम्ही वारंवार बोलत होतो असा खुलासा पोलिसांना दिला. तेथेच पोलिसांना एक गुप्त धागा मिळाली. कारण सदरील महिलेला गणेश चव्हाण तिसऱ्या मोबाईल क्रमांकावरून चॉटिंग करत आसल्याचे पोलिसांच लक्षात आले.

गणेश चव्हाण हा जिवंत असल्याचा संशय स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना बळावला होता. गणेश चव्हाण जिवंत आहे. पण मयत कोण याचा प्रश्न पोलिसांना सतावित होता. त्यावरून स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथक गणेश चव्हाण यांच्या मार्गावर होते. एका गुप्त खबऱ्याकडून या प्रकरणातील गणेश चव्हाण हा विजयदुर्ग जिल्हा सिंधुदुर्ग येथील लपून बसल्याची माहिती मिळाली. दरम्यान स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ, पोलीस अंमलदार अर्जुन राजपूत, महादेव बिलापट्टे ,युवराज गिरी, तुराब पठाण, रामलिंग शिंदे, नवनाथ हसबे, सर्जेराव जगताप यांनी सिंधुदुर्ग येथे सापळा लावून पळून जाण्याच्या बेतात असलेल्या गणेश चव्हाण यांच्या मुसक्यावळ्या. त्याला लातूर येथे हजर करून त्याला जळीत कार हत्याकांडाविषयी अधिक माहिती घेतली असता त्यांनी आपल्या गुन्ह्याची कबूल देऊन बोलण्यास सुरुवात केली. दीड वर्षापासून गणेश चव्हाण आर्थिक अडचणीमध्ये होता त्याने मागील तीन वर्षापूर्वी स्वताचे एक कोटीचे टर्म इन्शुरन्स काढलेले होते त्याच्यावर सुमारे ५७ लाख रुपयेचे कर्ज होते. सदरचे कर्ज फेडण्यासाठी तो मागील एका महिन्यापासून स्वतः आत्महत्या करण्याचा किंवा इतर एखाद्या व्यक्तीचा खून करू तो स्वतःच असल्याचा बनवा करण्याचा प्रयत्न करत होता. असे केल्यास इन्शुरन्सचा लाभ कुटुंबाला मिळेल व त्याचे काढलेले कर्ज नील होईल असा त्याचा विचार होता.

दरम्यान १३ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास गणेश चव्हाण घरातून बाहेर पडला. तो याकतपुर रोड चौका जवळ आला असता त्याच्या स्कोडा गाडीला एका ५० वर्षीय इसमाने हात दाखवून लिफ्ट मागितली. त्यावेळेस गणेश चव्हाण यांनी आपली स्कोडा कार थांबवून सदरील व्यक्तीला आपल्या गाडीत बसवले. सदरील व्यक्तीला त्याचे नाव गाव विचारले असता त्यांनी आपले नाव गोविंद किशन यादव असे असून तो मूळचा औसा तालूक्यातील बोरफळ येथील राहणारा असून सध्या तो औसा शहरातील पाटील गल्ली येथे वास्तव्यास असल्याचे सांगितले. गोविंद यादव व्यक्ती हा दारूच्या नशेत होता.

गोविंद यादव यांनी गणेश चव्हाण यांच्याकडे मला औसा शहरातील किल्ला रोड येथे सोडण्याची विनंती केली. तेव्हा गणेश चव्हाण यांनी आपण तिकडेच जात असल्याचे सांगून गोविंद यादव याला विश्र्वासात घेतले. दरम्यानच्या काळात गणेश चव्हाण यांच्या मनात कुटुंबाला एक कोटीचा टर्म इन्शुरन्स रक्कम मिळावी व कर्ज माफ व्हावे असा विचार मनात येऊन गेला. त्यासाठी त्याच्या मनात एक कल्पना येऊ लागली. गोविंद यादव याला मारून स्वतः मयत झालो असा बनावा दाखवण्याचा विचार करू लागला त्यामुळे गणेश चव्हाण यांनी गोविंद यादव यास तू काही खाणार आहेस का अशी विचारणा केली असता गोविंद यादव यांनी चिकन खातो असे सांगितले. त्यानंतर हे दोघे एका धाब्याजवळ गेले. गणेश चव्हाण याने धाब्यावरून चिकन पार्सल घेतले. पुढे गणेश चव्हाण यांनी आपली स्कोडा गाडी वानवरडा पाटी ते वानवडा या गावी जाणाऱ्या रोडला आणली काही अंतरावर जाऊन गाव व घरी किती अंतरावर आहेत याचा अंदाज घेतला. तसेच गाडी परत वळून आणून वानवडात जाणाऱ्या रोडला लावली त्यानंतर गोविंद यादव यास चिकन खाण्यासाठी दिले. त्यांनी थोडे चिकन खाऊन नंतर खाण्यास नकार दिला. दारूच्या अमलाखाली असलेला गोविंद यादव गाडीमध्ये झोपला. तेव्हा गणेश चव्हाण यांनी उरलेले चिकन डब्बासह बाजूच्या शेतात फेकून दिले. तसेच गोविंद यादव यांच्या खिशातील देशी दारूच्या बाटल्या काढून घेताना एक बाटली अंधारात खाली पडली. गणेश चव्हाण यांनी बाजूच्या सीटवर असलेल्या गोविंद यास ड्रायव्हर सीटवर ओढून बसवले व शीट बेल्ट लावला. ड्रायव्हर सीटच्या बाजूला असलेल्या सीटवर सोबत असलेल्या काडी पेट्यातील खाड्या सर्व एकत्र करून शीटवर टाकल्या. तसेच पेट घेण्यासाठी प्लास्टिक पिशवी शीटवर टाकून काडी ओढून पेटवली. व आपल्या हातातील कड ड्रायव्हर सीटवर ठेवून तो गाडी लॉक करून बाजूला सरकाला. जाताना लवकर पूर्ण गाडी पेट घ्यावी यासाठी पेट्रोल टाकीचे झाकण उघडे ठेवले व तो तिथून काही अंतरावर निघून गेला. गाडीने पूर्ण पेट घेतली तेव्हा तो चालत तुळजापूर मोड येथे आला तिथून तो शर्मा ट्रॅव्हल्स ने कोल्हापूर या ठिकाणी गेला. पुढे कोल्हापूर होतो सिंधुदुर्ग विजयदुर्ग येथे गेला. तेथे पोलिसानी मूस्क्या आवळल्या. या खून प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक डाके यांच्या फिर्यादीवरून गणेश गोपीनाथ चव्हाण यांच्या विरोधात औसा पोलीस ठाणे येथे खून करून पुरावे नष्ट केली म्हणून गुरनं. ५२१/ २०२५ कलम १०३ (१) २३८ बीएनएस प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मयत गोविंद किशन यादव हा बेपत्ता असल्याची तक्रारीवरून औसा पोलीस स्टेशन येथे मिसिंग दाखल करण्यात आली होती. औसा पोलीस आणि स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने या संदर्भातही निरीक्षणे नोंदवली होती. दररोज औसा ते बोरफळ असा प्रवास करणारे गोविंद किशन यादव हे १३ डिसेंबर २०२५ पासून बेपत्ता झाले होते. पुन्हा कुठेच दिसून आले नव्हते. दरम्यान गोविंद किशन यादव हा मूळचा औसा तालुक्यातील बोरफळ या गावचा रहिवाशी होते. ते गेल्या अनेक वर्षापासून औसा शहरातील पाटील गल्लीमध्ये वास्तव्यास आला होता. त्यांना पत्नी दोन मुले असा परिवार होता. बोरफळ गावात असलेली आपली जमीन कसून तो आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत होता. एकंदरीत गोविंद यादव यांच्या घरची परिस्थिती बेताची होती. गोविंद याधवची दोन्ही मुले कमवते होते. तसेच गोविंदा यादव शेतातील कामे संपले की मिळेल तेथे मोल मजुरी करून आपली उपजीविका भागवत होता. कधी कधी तो औसा शहरातील जुन्या बसताना का शेजारी असलेल्या भाजी मंडईत हमाली देखील करत होता. स्वभावाने मनमिळावू असलेला गोविंद यादव याला दारूचे व्यसन जडले होते. सकाळपासून संध्याकाळपर्यंत तो दारूच्या अधीन गेला होता. दारू पिण्या इतके पैसे प्राप्त झाले की त्याचे काम संपले असाच विषय त्याच्या बाबतीत ठरला होता. आलेल्या मोलमजुरीतून दारू व्यसन करून उरलेले पैसे तो कुटुंबासाठी खर्च करत होता.

अधून - मधून तो आपल्या गावाकडे देखील जात होता. मात्र १३ डिसेंबरला बाहेर गेलेले गोविंद यादव घरी परतले नाहीत. या खून प्रकरणा तपासात पोलिसांनी महत्वाचे पूरावे हास्तगत केले असून या प्रकरणाचा पुढील तपास औसा पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक रेवनाथ डमाळे हे करीत आहेत.सदरचा तपास हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी कुमार चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ, पोलीस अंमलदार अर्जुन राजपूत, माधव बिलापट्टे, युवराज गिरी, तुराब पठाण, रामलिंग शिंदे, नवनाथ हसबे, सर्जेराव जगताप, राजेश कंचे, श्रीनिवास जांभळे, जमीर शेख तसेच औसा पोलीस स्टेशनचे अमलदार मोतीराव घुले, रामकिशन गुट्टे, मुबारक सय्यद, हनुमंत पडिले, दिनेश गवळी, अशोक राठोड, रतन दंतुरे, सचिन मंदाडे, भागवत गोमारे, सूर्यकांत मगर, गोविंद पाटील तसेच सायबर पोलीस स्टेशनचे शैलेश सुडे, महिला पोलीस कर्मचारी अंजली गायकवाड यांनी तपास कामी उत्कृष्ट कामगिरी केली.

क्राईम संध्या | सोमवार दि. २२ डिसेंबर २०२५ ते रविवार दि. २८ डिसेंबर २०२५ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com | ३

# 'रसिका शिक्षण संकुल': आचार, विचार आणि संस्काराने समृद्ध शिक्षणसंस्था-ह.भ.प.गहिनीनाथ महाराज औसेकर



**देवणी : वार्ताहर**

रसिका शिक्षणसंस्था आचार, विचार आणि संस्काराने चालणारी समृद्ध शिक्षण संस्था असून या संस्थेने हजारो विद्यार्थ्यांना ज्ञान आणि संस्कार देऊन समृद्ध केले आहे. म्हणून अशा शिक्षण संस्था विकसित होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी केले आहे. जनसेवा सेवाभावी प्रतिष्ठान भोपणी अंतर्गत रसिका शैक्षणिक संकुल देवणी येथे नूतन इमारतीच्या भूमिपूजन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी त्यांनी या शिक्षण संस्थेच्या प्रगतीसाठी आशीर्वचन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षक आमदार विक्रम काळे उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून आमदार संजय बनसोडे, आमदार सतीश चव्हाण यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार धर्माजी सोनकवडे, अॅड.व्यंकटराव बेद्रे, संस्थाध्यक्ष गोविंदराव भोपणीकर, बबनजी आबा भोसले अंकुशजी नाडे, रामराव बिरादार भोपनीकर, माजी महिला व बालकल्याण सभापती कुशावर्तीताई बेळे, दिशा प्रतिष्ठानचे अध्यक्ष सोनू डगवाले, मनोज कन्नाडे (राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेश सरचिटणीस) यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संस्थासचिव गजानन भोपणीकर म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विशेषतः मुलींना प्राथमिक ते उच्च शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणे हे आबासाहेब भोपणीकर यांचे स्वप्न होते. त्यांच्या स्वप्नपूर्तीच्या दृष्टीने १००० निवासी विद्यार्थ्यांच्या सुविधेसाठी वस्तीग्रह उभारण्यात येणार आहे. अध्यक्षीय समारोपात आ. विक्रम काळे म्हणाले, शाहू, फुले, आंबेडकरांची विचारधारा घेऊन काम करणारे मा. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार नेतृत्व अधिक बळकट करण्यासाठी आम्ही सर्वजण कार्य करीत आहोत. ही नवी दृष्टी स्वीकारून भोपणीकर वाटचाल करीत आहेत. त्यांना ग्रामीण भागातील तरुणांनी सहकार्य केले पाहिजे. तरच विकासाच्या संधी ग्रामीण भागापर्यंत निर्माण करता येईल. असे ते म्हणाले. या कार्यक्रमास संस्था सहसचिव सौ. गीतांजली भोपणीकर, कविता बिरादार, संगीता बिरादार, भामाबाई पाटील, मधुकरराव लांडगे, सौ. मीनाक्षी शिंगडे (जिल्हाध्यक्ष, महिला राष्ट्रवादी काँग्रेस), प्रणिता सूर्यवंशी शहर अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस लातूर, रसिका महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे, आबासाहेब इंग्लिश स्कूलचे प्राचार्य अहमद भट, वलांडीच्या माजी सरपंच शीतल सोनकवडे, राष्ट्रवादी युवा नेते अमोल कांडगिरे अंकुश माने, प्रीतम आष्टुरे, रामदास नगराळे यांच्यासह देवणी तालुक्यातील पालक, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर शिवाजी सोनटक्के व सौ. शुभांगी माने मॅडम यांनी केले आभार प्रदर्शन प्रा. प्रशांत भंडे यांनी व्यक्त केले.

# तुळजाई प्रतिष्ठान व सोहम फाऊंडेशनतर्फे महिलांना अल्पदरात शिलाई मशीनचे वाटप



**लातूर : वार्ताहर**

महिलांच्या सबलीकरणासाठी तसेच त्यांना आर्थिक दृष्टया सक्षम करण्याच्या उद्देशाने तुळजाई प्रतिष्ठान व सोहम फाऊंडेशन, धाराशिवच्या वतीने नुकतेच लातूर तालुक्यातील चिंचोलीराव वाडी येथील महिलांना अल्पदरात शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी चिंचोलीराव वाडीचे सरपंच दत्ता फुलचंद सप्ताळ, उपसरपंच अनुसया व्यंकट पिंपरे, ग्रामविकास अधिकारी आर.के. मठपती, अरविंद दिवशे, तांबोळी मॅडम, प्रतिभा मॅडम फाऊंडेशनचे अध्यक्ष मदन कावळे, राघव गडकर, जिल्हा समन्वयक कल्याणी हाके आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. तुळजाई प्रतिष्ठान व सोहम फाऊंडेशनच्या वतीने लातूर जिल्ह्यातील महिलांना सक्षम करण्याच्या उद्देशाने अशा प्रकारचे उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचबरोबर गरजू विद्यार्थ्यांनाही लॅपटॉपसह अन्य आवश्यक साहित्य अल्पदरात वितरित केले जाणार आहे. त्यासाठीही संस्थेच्या वतीने सर्वतोपरी प्रयत्न आणि सहकार्य केले जात आहे. ही संस्था महिला सबलीकरण, आरोग्य, कृषी, पर्यावरण या विषयावही अग्रक्रमाने काम करते.

संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती मदन कावळे यांनी दिली. या उपक्रमाबद्दल बोलताना सरपंच दत्ता सप्ताळ यांनी समाधान व्यक्त करून अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील महिलांना खऱ्या अर्थाने सक्षम करणे शक्य होणार असल्याचे सांगितले.

# विरारमध्ये चुकीच्या उपचारांमुळे अडीच वर्षांच्या मुलाचा दुर्दैवी मृत्यू; बनावट क्लिनिकवर कारवाई

**विरार : वार्ताहर**

विरार पूर्वेकडील सहकार नगर येथील साई अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या संतोष कुमार कामत यांच्या अडीच वर्षांच्या मुलाच्या संशयास्पद मृत्यूने संपूर्ण परिसराला धक्का बसला आहे. प्राथमिक तपासात मुलावर उपचार करणाऱ्या क्लिनिकमध्ये गंभीर उल्लंघने उघडकीस आली आहेत. या घटनेनंतर, आरोग्य विभाग, महानगरपालिका आणि पोलिस प्रशासनाने कारवाई केली आहे. तपासादरम्यान, हे स्पष्ट झाले की होमिओपॅथिक प्रणालीमध्ये नोंदणीकृत एक डॉक्टर क्लिनिकमध्ये अॅलोपॅथिक औषधे लिहून देत होता, जे कायद्याच्या आणि वैद्यकीय नियमांच्या अगदी विरुद्ध आहे. नियमांनुसार, डॉक्टर ज्या वैद्यकीय प्रणालीमध्ये नोंदणीकृत आहे तिथेच प्रॅक्टिस करू शकतो. असे असूनही, डॉक्टरने मुलाला अॅलोपॅथिक औषधे दिल्याचा आरोप आहे, ज्यामुळे त्याची प्रकृती बिघडली आणि शेवटी त्याचा मृत्यू झाला. या गंभीर निष्काळजीपणाच्या पार्श्वभूमीवर, वसई विरार




शहर महापालिकेने तात्काळ चौकशी करून कारवाई केली. महापालिकेच्या वतीने आरोग्य अधिकारी रिद्धी पाटील यांनी संबंधित डॉक्टर डॉ. भगवंत काटे यांच्याविरुद्ध विरार पोलीस ठाण्यात औपचारिक तक्रार दाखल केली आहे. तक्रारीत बेकायदेशीरपणे अॅलोपॅथिक औषधे लिहून देणे, नियमांचे उल्लंघन करणे आणि रुग्णाच्या जीवाला धोका निर्माण करणे असे गंभीर आरोप आहेत. विरार पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल सुनील शाळकर या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. पोलीस वैद्यकीय अहवाल, औषधांचे नमुने आणि क्लिनिकशी संबंधित सर्व कागदपत्रांची कसून तपासणी करत आहेत. तपासाचा प्राथमिक उद्देश मुलाच्या मृत्यूचे कारण आणि उपचारात निष्काळजीपणाची पातळी निश्चित करणे आहे. या घटनेनंतर सहकार नगर आणि परिसरात संतापाचे वातावरण आहे. स्थानिक रहिवाशांचे म्हणणे आहे की जर बोगस आणि बेकायदेशीरपणे चालवल्या जाणाऱ्या क्लिनिकवर वेळीच कठोर कारवाई केली असती तर अशा दुःखद घटना रोखता आल्या असत्या. अशा क्लिनिक तात्काळ बंद कराव्यात आणि दोषी डॉक्टरांचे परवाने रद्द करावेत अशी मागणी लोकांनी केली आहे. पोलीस आणि महापालिका प्रशासनाने खात्री दिली आहे की तपास निष्पक्षपणे केला जाईल आणि दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. बाळाच्या मृत्यूने आरोग्यसेवेत दक्षता आणि कडकपणा वाढवण्याची गरज पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे.

# विज्ञान व तंत्रज्ञानामुळे शेतीला नवी दिशा -अशोक जैन

## जैन हिल्स येथे कृषी महोत्सवाचे अशोक जैन यांच्याहस्ते उद्घाटन



**जळगाव : वार्ताहर**

शेतकऱ्यांनी जैन हिल्स येथील उच्च कृषितंत्रज्ञान पाहून त्याचा वापर आपल्या शेतात करावा. जेणे करून फायदेशीर आणि शाश्वत शेती करता येईल. या तंत्रज्ञानाचा फायदा स्वतः घ्यावा आणि इतरांनाही माहिती द्यावी, असे आवाहन जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन यांनी केले. जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. तर्फे जैन हिल्स येथे 'कृषी महोत्सव २०२५-२६' चे आयोजन केले आहे. त्याच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. सांगली जिल्ह्यातील पलूस येथील शशिकांत पाटील यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी सहव्यवस्थापकीय संचालक अजित जैन, अभंग जैन, डॉ. अनिल ढाके, डॉ. बी.के. गौतम देसर्डा, बी. डी. जडे, अजय काळे, संजय सोनजे यांच्यासह जैन इरिगेशनचे सहकारी उपस्थित होते. शेतकऱ्यांना शेतीतील नव तंत्रज्ञानाचा अभ्यास व्हावा, या दृष्टीने गेल्या तीन वर्षांपासून 'कृषी महोत्सव' आयोजन केले जात आहे. यामध्ये सूक्ष्म सिंचनाचे (ठिबक) महत्त्व, पाण्याचे योग्य नियोजन, त्यातून उत्पादनात होणारी वाढ यावर विशेष भर देण्यात आला आहे. 'अधिक उत्पादन, अधिक नफा' असे सूत्र आहे. विज्ञान अन् तंत्रज्ञानाच्या जोडीने शेतीला नवी दिशा देणारा हा महोत्सव' आहे. यामुळे 'सायन्स-टेक@वर्क' ही या वर्षाची संकल्पना आहे. महिनाभराच्या कालावधीत हायटेक, प्रिसिजन आणि क्लायमेट स्मार्ट शेतीचे जागतिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांना बघायला मिळणार आहे.

जैन हिल्सवर उभे केलेले विविध पिकांचे प्रत्यक्ष प्रयोग आणि शास्त्रोक्त शेती पद्धतींचे प्रात्यक्षिके येथे बघायला मिळणार आहेत. बघितल्याशिवाय विश्वास बसत नाही हे तत्त्व डोळ्यासमोर ठेवून, शेतकऱ्यांना केवळ माहिती न देता तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष अनुभूती मिळणार आहे. कृषी महोत्सव म्हणजे प्रगतीचे नवे साधन ठरेल, त्यामुळे शेतकरी बांधवांनी यासाठी अवश्य यावे, असे आवाहन करण्यात आलेले आहे.




# उद्योगाला चांगले दिवस येवो ग्राहकांना सर्व वस्तू आहेत त्याच किमतीत भेटाव्यात -अभिजीत औटे

**देवणी : वार्ताहर**

येत्या २४ डिसेंबर हा राष्ट्रीय ग्राहक दिन हा आपण शासना तर्फे राबवतोय पण तो राबावत अस्थाना आज आपण पाहतोत की एखादी वस्तूचा तुटवडा झाला की त्या वस्तूची किंमती पेक्षा जास्त किमतीला तो विकतो या बद्दल ग्राहकाचे नुकसान होते, आपण एक उदाहरण घेऊ, की १ लिटर पानी बॉटल ची किंमत असते १५ रुपये पण दुकानदार २० रुपायाला विकतो मग हि लुट नाही का आपण कायदे बनवतो त्याची खरच ज्या दिवशी अमलबजावणी झाली, तर तो खरा ग्राहक दिन साजरा होईल, आज महारास्ट्रात पाहिल तर काही जिल्ह्यात १०० रुपयांचा स्टेंप पेपर हा १२० ला विकला जातो ही २० रुपायांची लुट झाली, तरी सर्वसामान्य व्यक्ती आवाज उठवत नाहीत, पण आशा घटना झाल्यावर अधिकारी यांनी तात्काळ कारवाई केल्यास व त्याचे योग्य उपाय योजना केल्यास तो खरा ग्राहक दिन साजरा होईल व त्या दिवशी आपण खरा ग्राहक दिन साजरा केला असे म्हणता येईल आम्ही आमच्या ग्राहक जनजागृती सेवा संस्था तर्फे महाराष्ट्र भर जनजागृती अभियान राबवून ग्राहकास खरच ग्राहक दिन साजरा होण्यासाठी कायमच प्रयत्न करनार आहोत पण ग्राहक स्वतः जागरुक झाला पाहिजे असे मत ग्राहक जनजागृती सेवा संस्था महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अभिजीत औटे यांनी राष्ट्रीय ग्राहक हक्क दिना निमित्त 'क्राईम संध्या'शी बोलताना आपले मत मांडले.



# देवणी तालुक्यात दर्श वेळ अमावस्या साजरी

**देवणी : वार्ताहर**



वेळ अमावास्या साजरी करण्याची शेकडो वर्षापासून परंपरा मराठवाड्यात आजही पाळली जाते. कोणत्याही पुरानात किंवा इतिहासात नसलेला मात्र शेकडो वर्ष जुना सण म्हणजे वेळ अमावास्या. या सणाला हिरवाईचा अपूर्व सोहळा असंही म्हटलं जात. हा सण लातूर आणि उस्मानाबाद, सोलापूर आणि बीड जिल्ह्याच्या काही भागात साजरा केला जातो. दरवर्षी या सणाची घराघरात जय्यत तयारी सुरु असते. तुरीच्या शेंगा, चवळी, भुईमूग, हरभरा, मेथीची भाजी, कांद्याची पात हा सगळा रानमेवा हरभरे पिठात कालवून चिंच आणि अंबिवलेल्या ताकाच्या पाण्यात शिजवलेली भज्जी, भाकरी, गव्हाची खीर केली जाते. १०० ते १५० लोक जेवतील एवढा स्वयंपाक करून वाजत गाजत घरातून डोक्यावर घेऊन शेतात जातात. तिथे शेताची पूजा केली जाते. त्यानंतर सर्वजण जेवण करतात. विशेष म्हणजे या दिवशी जिल्हा प्रशासनाकडून सुट्टी दिली जाते, वेळा अमावास्येच्या दिवशी प्रत्येक शेतात ज्वारीच्या कडब्याच्या पेंड्याची कोप करुन भक्ती भावाने केली जाते. संध्याकाळी ज्वारीच्या पेंडीचा टेंबा करुन रब्बीचा गहू, हरभऱ्याच्या वावराला ओवाळून काढायची प्रथा आहे. त्यानंतर तो टेंबा मिरवत जावून गावातील मंदिराच्या समोर टाकायचा. मोठी आग करुन ती शमली की तिच्या राखेतून विस्तव असतानाच ती ठोकरुन घरी जायची परंपरा आहे. पेरणीनंतर येणाऱ्या सातव्या अमावास्येला हा उत्सव होतो. गावातील सर्व थोर, लहान शेतात गोळा होत या काळ्या आईची पूजा करतात आणि वनभोजनाचा आनंद लुटतात. देवणी तालुक्यातील बोरोळ येथे वेळ अमावस्या साजरी करताना लातूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवक सरचिटणीस (एनसीपी) प्रताप कोयले, उषा कोयले, प्रतीक कोयले यांचा फोटो दिसत आहे.

## कृषि विभाग

उप विभागीय कृषि अधिकारी वाडा, जिल्हा पालघर

**ई-निविदा सुचना क्र. उपविकृअवा -०२ /२०२५-२६**

खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे विविध कामे करण्यासाठी उप विभागीय कृषि अधिकारी वाडा, जिल्हा पालघर हे बी-१ प्रपत्रात ई-निविदा योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून आमंत्रित करण्यात येत आहेत. सविस्तर माहिती महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक निविदा व्यवस्थापन प्रणालीचे https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २४/१२/२०२५ पासून पहावयास व डाऊनलोड करावयास मिळतील. सर्व शुद्धिपत्रक, दुरुस्त्यासुद्धा याच संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील. कामाचे संक्षिप्त वर्णन खालील प्रमाणे :- (रक्कम- रुपये)

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम | बयाना रक्कम | निविदा शुल्क + GST | नोंदणी वर्ग | निविडा डाऊनलोड सुरू करणे दिनांक | निविदा सादर करणेचा अंतिम दिनांक | निविदा उघडणे दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पात्र नोंदणीकृत कंत्राटदारासाठी | | | | | | | | |
| १. | मजगी गाव धामणी गट क्र. ३६, मजगी गाव वाशाळा गट क्र. २० ते २२ ता. मोखाडा, जि. पालघर | ४२८९५४ | ४२९० | ५९० | योग्य त्या वर्गातील पात्र नोंदणीकृत कंत्राटदार | २४/१२/२०२५ सकाळी ११ वा. | ३१/१२/२०२५ सायं. ४ वाजेपर्यंत | ०१/०१/२०२६ सायं. ४ वाजता |
| २. | जुभादु गाव कोंडगांव गट क्र. १ ते २४ ते ८०, ता. विक्रमगड, जि. पालघर | ९६३१२९ | ९६३१ | ५९० | योग्य त्या वर्गातील पात्र नोंदणीकृत कंत्राटदार | २४/१२/२०२५ सकाळी ११ वा. | ३१/१२/२०२५ सायं. ४ वाजेपर्यंत | ०१/०१/२०२६ सायं. ४ वाजता |
| ३. | जुभादु गाव दादडे गट क्र. १ ते १०, जुभादु गाव मोह खु गट क्र. १ ते ११, जुभादु गाव कोंडगांव गट क्र. २५ ते २८ ता. विक्रमगड, जि. पालघर | ९७८८३२ | ९७८८ | ५९० | योग्य त्या वर्गातील पात्र नोंदणीकृत कंत्राटदार | २४/१२/२०२५ सकाळी ११ वा. | ३१/१२/२०२५ सायं. ४ वाजेपर्यंत | ०१/०१/२०२६ सायं. ४ वाजता |
| ४. | जुभादु गाव कोंडगांव गट क्र. २९ ते ३२ ता. विक्रमगड, जि. पालघर | २१६९८६ | २१७० | ५९० | योग्य त्या वर्गातील पात्र नोंदणीकृत कंत्राटदार | २४/१२/२०२५ सकाळी ११ वा. | ३१/१२/२०२५ सायं. ४ वाजेपर्यंत | ०१/०१/२०२६ सायं. ४ वाजता |
| ५. | मजगी गाव मोहे खु गट क्र. १ ते ७, ता. वक्रमगड, जि. पालघर | ९१०२४५ | ९१०२ | ५९० | योग्य त्या वर्गातील पात्र नोंदणीकृत कंत्राटदार | २४/१२/२०२५ सकाळी ११ वा. | ३१/१२/२०२५ सायं. ४ वाजेपर्यंत | ०१/०१/२०२६ सायं. ४ वाजता |

टिप : कोणतीही एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार उपविभागीय कृषि अधिकारी वाडा, जिल्हा पालघर यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
उप विभागीय कृषि अधिकारी
वाडा, जिल्हा पालघर

जिमाका/पालघर/जाहि १२७/४९८/२०२५ दिनांक : १९/१२/२०२५

# युती-आघाडीला फुटीचे ग्रहण!

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका म्हणजे महायुती आणि महाविकास आघाडीच्याही अवघड जागेच दुखणं झालेलं आहे. कारण दोन्हीकडे मित्रपक्षांना स्वबळाची खुमखुमी आली आहे. एकीकडे महायुतीतील भाजपा, शिंदेसेना आणि अजितदादांच्या राष्ट्रवादीत पहिल्या पासून बेबनाव आहे. तर दुसरीकडे महाविकास आघाडी मधेही तणाव आहे. मनसेमुळे काँग्रेस महाविकास आघाडीतून बाहेर पडल्यात जमा आहे. त्यामुळे या निवडणुकीत खिचडी होणार आहे. पालिका निवडणुकीसाठी भलेही युतीची चर्चा जरी होत असली तरी शिवसेनेच्या अनेक बालेकिल्ल्यावर भाजपची नजर आहे. शिवसेनेच्या या जागा स्वत:कडे घेण्यासाठी भाजप आग्रही असताना, या जागांबाबत तडजोड करू नये, अशी मागणी शिवसेना नेत्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. त्यामुळे स्वतंत्र लढण्यासाठी शिंदे यांच्यावर शिवसेना नेत्यांकडून दबाव आणला जात आहे. काल संयुक्त पत्रकार परिषदेत १५० जागांवर सकारात्मक चर्चा झाली असली तरी ७७ जागांवर रस्सी खेच होण्याची शक्यता आहे. या ७७ जागांमध्ये शिवसेनेचे काही वॉर्ड आहेत त्यावर भाजपकडूनही दावा केला जात आहे. इच्छुकांच्या मुलाखतीमध्ये अनेक इच्छुक उमेदवारांनी आपण स्वतंत्र निवडणूक लढायला हवी अशी इच्छाही मुलाखत घेणाऱ्या नेत्यांजवळ अनेकानी बोलून दाखवली. दुसरीकडे, उर्वरित ७७ जागांबाबतची चर्चा अंतिम टप्प्यात आहे. येत्या दोन-तीन दिवसांत या चर्चेचा निकाल लागेल, अशी माहिती मुंबई भाजपचे अध्यक्ष अमित साटम यांनी दिली. साटम म्हणाले की, उर्वरित जागांवर अंतिम निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस एकमताने घेतील. मुंबई महानगरपालिकेला भ्रष्टाचारमुक्त प्रशासन देण्याचा निर्धार महायुतीचा असून मुंबईकरांची इच्छा पूर्ण करण्यासाठी भाजप, शिवसेना आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकजुटीने काम करत आहेत. कोण किती जागा लढणार यापेक्षा महायुती २२७ही जागा लढवेल आणि १५० पेक्षा अधिक जागा जिंकून महायुतीचाच महापौर विराजमान होईल, असा विश्वास साटम यांनी व्यक्त केला. गेली २५ वर्षे महानगरपालिकेत सत्तेत राहून भ्रष्टाचार केल्याचा आरोप करत, मुंबईकरांच्या हितासाठी हा प्रयत्न हाणून पाडला जाईल, असे त्यांनी सांगितले. धनुष्यबाण आणि कमळ हे एकाच ध्येयासाठी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नवाब मलिक यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाबाबत बोलताना साटम म्हणाले की, गंभीर आरोप असलेल्या व्यक्तींशी कोणतेही संबंध ठेवले जाणार नाहीत. तर दुसरीकडे शरद पवार यांच्या पक्षातील कुठल्याही नेत्याला भाजपत घेण्यास पक्ष कार्यकर्त्यांचा तीव्र विरोध आहे. आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्या तोंडावर महाविकास आघाडीमध्ये अचानक मोठा अडथळा निर्माण झाला आहे. मुंबई काँग्रेसचे प्रभारी रमेश चेनिथाला आणि अध्यक्षा वर्षा गायकवाड यानी निवडणूक स्वबळावर लावण्याची एकतर्फी घोषणा करून महाविकास आघाडीतील समन्वयाचा भंग केल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने केला आहे. काँग्रेसच्या या भूमिकेमुळे मुंबईतील राजकीय समीकरणे अनपेक्षितपणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली असून, याचा थेट फायदा भाजपला होईल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसने दिला आहे. शरदचंद्र पवार प्रदेश प्रवक्ते आणि युवक मुंबई अध्यक्ष ॲड. अमोल मालेले यांनी काँग्रेसच्या या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ॲड. अमोल मातेले यांनी काँग्रेसच्या 'स्वबळा'च्या भूमिकेवर सडकून टीका केली आहे. काँग्रेसच्या निर्णयाचा थेट आणि उघड फायदा भाजपला मुंबईसारख्या अत्यंत स्पर्धात्मक निवडणुकीतमतांचे विभाजन म्हणजे विरोधकांची तुकडेबाजी आणि अवाजवी अहंकारामुळे घेतलेल्या एकतर्फी भूमिकेमुळे भाजपला फायदा होणार आहे. सध्या दोन्हीकडे एकमेकांचे ताकतवर उमेदवार पळण्याची स्पर्धा लागली आहे. कारण ज्याची निवडून येण्याची क्षमता आहे अशाच उमेदवारी दिली जाईल असे महायुतीतील भाजपने स्पष्ट केले आहे. त्यामुळे निवडून येण्याचीबकशंता असलेले शिंदे सेनेतील तसेच अजितदादांच्या राष्ट्रवादी मधील सक्षम नेत्यांवर भाजपा कडून जाळे टाकले जात आहे. माविआ मध्ये फूट पडल्याचे जवळपास नक्की झाले आहे. कारण ठाकरे बंधू एकत्र आल्यामुळे मनसेला विरोध करणारी काँग्रेस आता माविआ सोबत नसेल याउलट शरद पवारानी सामंजस्याची भूमिका घेत ठाकरे बंधू सोबत राहण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे महापालिका निवडणुकीत प्रत्यक्षात कोण कुठे असेल हे सांगता येत नाही.

## दुसऱ्या अभिजात आंतरराष्ट्रीय लघु चित्रपट महोत्सवाचा समारोप

# 'ब्रम्हकमळ' सर्वोत्कृष्ट लघुपटाचा पहिला पुरस्कार प्रदान

**लातूर : वार्ताहर**

अभिजात फिल्म सोसायटी व दयानंद शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दुसऱ्या अभिजात इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवलचा पारितोषिक वितरण सोहळा प्रसिद्ध लेखक व कवी बालाजी सुतार यांच्या हस्ते पार पडला. वृद्धापकाळातील एका स्त्रीची भावनिक व तरल कथा असलेल्या 'ब्रह्मकमळ' या लघुपटास चित्रपती व्ही. शांताराम यांच्या नावाने दिला जाणारा सर्वोत्कृष्ट लघुपटाचा पहिला पुरस्कार प्रदान करण्यात आला. याच लघुपटाचे दिग्दर्शक आशुतोष जरे यांना सर्वोत्कृष्ठ दिग्दर्शकाचाही पुरस्कार मिळाला. 'सुलतान' आणि 'डिअर टीचर' या लघुपटांना अनुक्रमे द्वितीय व तृतीय पारितोषिक देण्यात आले.

'इन हाफ' या कलाकृतीस सर्वोत्तम ॲनिमेशनपटाचा पुरस्कार देण्यात आला तर 'वूमन ऑन फायर' या माहितीपटास सर्वोत्कृष्ट माहितीपट म्हणून गौरवण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या लेखक बालाजी सुतार यांनी लघुपटातून मांडल्या जाणाऱ्या गोष्टीला अधिक महत्व असल्याचे अधोरेखित करत कुठल्याही व्यावसायिक अपेक्षांचं ओझं नसलेलं लघुपट हे अतिशय नेमकं, प्रखर आणि गरजेचं माध्यम आहे असं मत व्यक्त केलं. तत्पूर्वी लातूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी वर्षा घुगे-ठाकूर यांनी महोत्सवास सदिच्छा भेट देत असताना लघुपट माध्यमातल्या कलात्मक दृष्टीकोनाबद्दल उपस्थित प्रेक्षकांशी संवाद साधला. विविध विषयावर संवाद साधण्यासाठी लघुपट हे अतिशय वेगवान आणि परिणामकारक माध्यम आहे हे सांगताना भविष्यात हा महोत्सव अजून मोठ्या प्रमाणात लोकांपर्यंत पोहचावा अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. सुमारे १२ देशातून आलेल्या १९ भाषांमधल्या निवडक १०० लघुपटांचे प्रदर्शन या महोत्सवात झाले. परिक्षक म्हणून ठाणे येथील संतोष पाठारे आणि नवी मुंबई येथील निलेश कुंजीर यांनी काम पाहिले. या कार्यक्रमास डॉ. मिलिंद पोतदार, प्रा. ओमप्रकाश झुरळे यांच्यासह अभिजात फिल्म सोसायटीचे अध्यक्ष जितेंद्र पाटील, डॉ. विश्वास शेंबेकर, डॉ. स्वप्नील देशमुख, धनंजय कुलकर्णी, प्रा शिवशंकर पटवारी, अभिषेक बुचके, प्रथमेश जाधव उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तीन दिवस मेहनत घेणाऱ्या दयानंद महाविद्यालयाच्या स्वयंसेवकांचे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजात फिल्म सोसायटीचे मधुसूदन कुलकर्णी यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ दुर्गा शर्मा यांनी केले.

# लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात अल्पसंख्याक हक्क दिवस साजरा




**लातूर : वार्ताहर**

जिल्हाधिकारी कार्यालयात आज अल्पसंख्याक हक्क दिवसानिमित्त जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या उपस्थितीत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अल्पसंख्याक समाजाचे हक्क, त्यांच्या विकासाच्या अनुषंगाने यावेळी मार्गदर्शन करण्यात आले. अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नटके, पुनर्वसन उपजिल्हाधिकारी संगीता टकले, रोहयोच्या उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, सामान्य प्रशासनच्या उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश पवार, जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड, जिल्हा परिषदेचे महिला बालकल्याण उप मुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. साकेब उस्मानी, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापक, तसेच जिल्हास्तरीय अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते. श्रीमती एन. एन. पटेल, प्रा. महावीर उदगीरकर, डॉ. साकेब उस्मानी, विजयकुमार परभणकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन झाले.

शासकीय अधिकारी, कर्मचारी म्हणून काम करताना प्रत्येकाने संविधानिक मूल्ये, समान संधी व सामाजिक सलोखा यांचा आदर राखत सेवा देणे आवश्यक आहे. समानता, बंधुता व न्याय हीच आपल्या लोकशाहीची खरी ताकद आहे, हे लक्षात ठेवून सर्वांनी आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी यावेळी केले. जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी सोमनाथ रेड्डी यांनी अल्पसंख्याक समुदायाच्या कल्याणासाठी जिल्ह्यामध्ये राबविण्यात येणाऱ्या केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांविषयी सादरीकरण करून योजनांची माहिती दिली. सहायक जिल्हा नियोजन अधिकारी शंकर सोपान साबरे उपस्थितांचे आभार मानले.

# हे का घडतंय?

**देवणी : शकिल मनियार**

एखाद्या नेत्याचं निधन झालं की त्याच्या बायकोला, मुलाला, मुलीला, बहिणीला, भावाला, पुतण्याला संधी देण्याचं भिकार धोरण सगळ्याचं राजकीय पक्षांनी बंद करायला हवं. असल्या भिकार धोरणाने विचारहीन, कर्तृत्वहीन आणि तत्वहीन लोक सत्तेच्या परिघात जमा होऊन चळवळीत, पक्ष संघटनेत आणि स्थानिक पातळीवर काम केलेले अनेक तयार झालेले कार्यकर्ते दूर राहतात एव्हाना ठेवले जातात. त्यामुळे नेता गेला की ही दर्जाहीन आणि कर्तृत्वहीन पिलावळ जमा करण्याचं धोरण कायमच बंद व्हायला हवं.

एखादा नेता दीर्घकाळ एखाद्या विचारांसाठी, पक्षासाठी काम करतो तेव्हा त्याला मानणारा एक वर्ग तयार होतो. त्यामध्ये त्याच्या कार्यकर्त्यासह मतदारसंघासह त्या त्या प्रदेशातील अनेकजण असतात. त्यांचं एक भावनिक नातं तयार होत. याच नात्याने ते त्या नेत्याच्या माध्यमातून विचारांसोबत आणि पक्षासोबत काम करतात. मात्र, तो नेता कधीतरी वृद्धापकाळाने, अकाली तर कधी अपघाताने जातो. इतक्या काळ काम केल्यानंतर त्या नेत्याच्या जाण्याने पक्षासह त्याच्या कार्यक्षेत्रात मोठी पोकळी निर्माण होते. सर्वकाही भावनिक वातावरण असत. अशा काळात लगेच त्या नेत्याच्या कुटुंबातील मुलगा मुलगी बायको पुतण्या किंवा भाऊ यांना पुढं केलं जात. त्याला नखाइतकाही कामाचा अनुभव नसला तरी एका मिनिटात तो गेली अनेक काळ घरच्या भाकरी खाऊन पक्षासाठी झटणाऱ्या कार्यकर्त्याच्या मानगुटीवर बसवला जातो हे सगळ्यात भिकार आणि दर्जाहीन राजकारण आहे. आणि ते गेली अनेक काळ होत आलंय हे अत्यंत वाईट आहे.

यामध्ये फक्त राजकीय पक्ष आणि नेतेच जबाबदार आहेत असं मुळीच नाही. याला कार्यकर्त्यांमधील आणि काही मतदारांमधील गुलाम मानसिकता कारणीभूत आहे. कारण कार्यकर्ते आणि जनता म्हणून ज्या एकोप्याने या घटनांना विरोध व्हायला हवा तो होत नाही. अनेकांनी स्वाभिमान गहाण ठेवल्याने कार्यकर्ते आणि अनेक मतदार पूर्णतः गुलाम मानसिकतेत वागतात आणि जगतात. आणि त्यांच्या या मानसिकतेवरच अनेक राजकीय नेत्यांच्या पुढच्या पिढ्या कुठलाच रस्त्यावरचा संघर्ष न करता आणि शेतकरी कष्टकरी कामगार यांचे प्रश्नावर न बोलता आमदार, खासदार आणि मंत्री होतात. या गुलाम कार्यकर्त्यानी आणि मतदारांनी या निष्क्रिय पिढ्या मोठ्या केल्या. कार्यकर्त्याच्या बायकोची मळकटलेली साडी, पोराला दोन हप्त्यापासून शाळेत जायला दप्तर नाही.

पोरगी नवा ड्रेस मगतीये तो नाही, दावणीला दोन खाट्या गाया. बापाचं धोतर फाटलंय हे सगळं चित्र डोळ्याआड करून हा गुलाम कार्यकर्ता या नेत्याच्या हाकेला जी जी करतोय आणि तेच वागणं तुम्हाला अनेक संधीपासून दूर ठेवतय. आता हे कुठंतरी राजकीय पक्षांनी लक्षात घ्यायला हवं किंवा कार्यकर्त्यानी आपला स्वाभिमान जागून ते पक्ष नेतृत्वाला करायला भाग पाडाव.



उदाहरण द्यायचं झालं तर संघर्ष करून भाजप वाढवला अनेक वाड्या वस्त्यांवर नेला त्या गोपीनाथ मुंडेंचं अपघाती निधन झालं. त्यांच्याबद्दल सर्वानाच आदर आणि आपुलकी होती हे नाकारता येणार नाही. पण त्यांची मुलगी प्रीतम मुंडे यांनी कुठला रस्त्यावरचा संघर्ष केला? त्यांचं भाजप पक्षवाढीत काय योगदान? त्यांना कोणत्या राजकीय कामाचा अनुभव होता? फक्त गोपीनाथ मुंडेंची मुलगी म्हणून असंख्य गोपीनाथ मुंडेंनी उभा केलेले कार्यकर्ते आणि मतदार यांचा कसलाच विचार न करता एका क्षणात प्रीतम मुंडेना उमेदवारी दिली. इतक्या मोठ्या नेत्याचा आणि पक्षाचा एकही कार्यकर्ता पक्ष नेतृत्वाला सापडला नाही का? हीच गोष्ट चंद्रपूरचे काँग्रेसचे खासदार बाळू धानोरकर यांच्याबाबत. बाळू धानोरकर काँग्रेसचे ताकतीचे कार्यकर्ते होते. पण ते गेले की प्रतिभा धानोरकर यांना पक्षाने तिकीट दिल. का तिथं दुसरा व्यक्ती पक्षाला सापडला नाही? गेली अनेक काळापासून पक्षासाठी काम करणारा एकतरी निष्ठावान मिळालाच असता. पण ते झालं नाही. हीच गोष्ट शिवसेना ठाकरे गटाचे अभिषेक घोसाळकर यांच्याबाबत. त्यांची हत्या झाली. त्यानंतर त्यांचे वडील राजकारणात सक्रिय असताना पक्षाने त्यांच्या पत्नी तेजस्वी घोसाळकर यांना संधी दिली. काय पाहिलं त्यांना संधी देताना? त्यांचं शिवसेना वाढीसाठी काय योगदान? फक्त अभिषेक घोसाळकर यांच्या पत्नी आहेत म्हणून लगेच संधी? त्यांच्यापेक्ष निष्ठावान कितीतरी दिवसांपासून पक्षवाढीसाठी काम करतात त्यांचं कुठं नाव तरी आहे का? आज प्रज्ञा सातव यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. तेही विधानपरीक्षेचा राजीनामा देऊन. पक्षाने काय म्हणून त्यांना संधी दिली होती? त्यांनी काँग्रेस पक्ष किती वाढवला? किती जागा निवडून आणल्या? शेतकरी, विध्यार्थी कामगार यांच्यासाठी किती आंदोलन मोर्चे काढले? फक्त राजीव सातव यांच्या पत्नी म्हणून लगेच संधी. पक्षासाठी आंदोलन, मोर्चे काढणारे, लाठ्याकाठ्या खाणाऱ्या कार्यकर्तांना का नाही मिळत इतक्या लवकर विधान परिषदेवर संधी? हे सगळं एकदा पक्ष नेतृत्वाने लक्षात घ्यावं किंवा हाडाच्या लढाऊ कार्यकर्त्यांनी आणून द्यावं. अन्यथा, पक्ष अशाच लोकांना तुमच्या मानगुटीवर बसवणार आणि ज्यांना बसवलय ते तुम्हाला गुलाम आणि गृहीत धरून केव्हाही कुणीकडंही जाणार...!

# राज्यात आता भीक मागण्यास बंदी येणार

## विधानसभेपाठोपाठ विधान परिषदेतही विधेयक मंजूर

**नागपूर : वार्ताहर**

राज्यात आता लवकरच भीक मागण्यास बंदी घालण्यात येणार आहे. विधानसभेपाठोपाठ आता विधान परिषदेमध्येही महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध विधेयक मंजूर करण्यात आलं. परंतु सभागृहातील अनेक सदस्य असमाधानी असताना गोंधळाच्या स्थितीत हे विधेयक मंजूर करण्यात आलं. त्यामुळे तालिका सभापती नीलम गोऱ्हे, शिवसेनेच्या आमदार मनिषा कायंदे, राष्ट्रवादीचे अमोल मिटकरा यांच्यासह अनेकांनी नाराजी व्यक्त केली. विधान परिषदेत हे विधेयक मंजूर झाल्यानंतर आता सभापतींच्या दालनात शनिवारी बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे. राज्यात भीक मागण्यास प्रतिबंध घालणारे विधेयक हे गोंधळाच्या स्थितीत विधान परिषदेत मंजूर करण्यात आलं. राज्याच्या मंत्री अदिती तटकरेंनी हे विधेयक मांडलं. त्यावर आमदार मनीषा कायंदे, अमोल मिटकरी आणि तालिका सभापती निलम गोर्हे यांनी असमाधान व्यक्त केलं.

महारोगी शब्द वगळण्यासाठी आलेल्या विधेयकाचा आणि त्याचे शीर्षक यात ताळमेळ नसल्याची प्रतिक्रिया आमदार एकनाथ खडसेंनी दिली. तर, विधेयकाबाबत माहिती दिलेल्या पुस्तिकेतील स्पष्टीकरणावर तालिका सभापती नीलम गोऱ्हेंनी असमाधान व्यक्त केले. सभागृहातील अनेक सदस्य असमाधानी असतानाही विधेयक मंजूर करण्यात आलं. या संबंधित विधान परिषद सभापतींच्या दालनात शनिवारी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. हिवाळी अधिवेशनाचा आज तिसरा दिवस आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था विधेयकावर बोलताना राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांना सत्ताधारी आणि विरोधी आमदारांनी घेरल. त्यामुळे विधानसभेत मुख्यमंत्र्यांनी यावर उत्तर दिलं. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था विधेयकावर दोन दिवस चर्चा झाल्यानंतर ते विधानसभेत मंजूर करण्यात आलं. महिला अत्याचारांना आळा घालण्यासाठी राज्य सरकारचं शक्ती विधेयक केंद्राने नाकरल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. २०२०-२१ मध्ये हे विधेयक विधिमंडळात मंजूर झालं, मात्र ते केंद्र सरकारने नाकारल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. सोबतच धर्मातरण आणि लव्ह जिहादविरोधी कायद्याबाबत पोलिस महासंचालकांच्या समितीचा अहवाल लवकरच सादर होण्याची अपेक्षा आहे. त्यानंतर पुढील रूपरेषा ठरवण्यात येईल, असंही मुख्यमंत्री म्हणाले.

# २७ डिसेंबरला शाळा-कॉलेज, कार्यालयांना सुट्टी जाहीर!

**मुंबई : वार्ताहर**

२०२५ चा शेवटटा डिसेंबर महिना जवळपास अर्धा संपायला आला. या महिन्यात विद्यार्थ्यांना अनेक दिवस सुट्ट्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना पालकांसोबत सुट्ट्या एन्जॉय करता येणार आहेत, तसेच आगामी परीक्षांची तयारीदेखील करता येणार आहे. दरम्यान २७ डिसेंबरला काही ठिकाणी शाळा,कॉलेज, सरकारी कार्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आलीय. जिल्हाधिकाऱ्यांनी यासंदर्भातील आदेश जारी केलेय. याबद्दल जाणून घेऊया. उत्तर प्रदेशातील उन्नाव जिल्ह्याचे जिल्हा दंडाधिकारी गौरांग राठी यांनी २७ डिसेंबर २०२५ म्हणजेच शनिवार या दिवशी संपूर्ण जिल्ह्यात सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. आता हा दिवस श्री गुरु गोविंद सिंह जी यांच्या जयंती निमित्त साजरा होणार आहे. राज्य सरकारने १७ डिसेंबर २०२४ रोजी २०२५ च्या सुट्ट्यांच्या यादीत बदल केला. शिख धर्मानुसार गुरु गोविंद सिंह जींची जयंती पौष महिन्याच्या सातव्या तारखेला येते आणि यावर्षी ती २७ डिसेंबरला आहे. त्यामुळे सरकारने ही तारीख सुट्टी म्हणून निश्चित केली. सर्व सरकारी कार्यालये जिल्हा प्रशासन, तहसील, ब्लॉक कार्यालये,सर्व शाळा-महाविद्यालये (खासगी आणि सरकारी दोन्ही), उत्तर प्रदेश मूलभूत शिक्षण परिषदेच्या शाळाही बंद राहणार आहेत. तसेच बँका आणि इतर महत्त्वाची कार्यालयेही बंद राहण्याची शक्यता आहे. २७ डिसेंबर रोजी शनिवार आहे आणि २८ डिसेंबरला रविवार




आहे. म्हणजे सलग २ दिवस म्हणजेच शनिवार-रविवारी पूर्ण सुट्टी मिळणार आहे.

अनेकांना तर शुक्रवार संध्याकाळपासूनच लांब वीकेंडचा आनंद घेता येणार आहे. जिल्हा दंडाधिकारी गौरांग राठी यांनी अधिकृत प्रसिद्धीपत्रक काढले. हा आदेश पोलिस अधीक्षक, मुख्य विकास अधिकारी आणि सर्व सरकारी विभागांना पाठवला आहे. त्यामुळे आता कोणालाही याबाबत शंका राहिलेली नाही. उन्नाव जिल्ह्यात २७ डिसेंबरला पूर्ण बंद राहणार आहे.

### उत्तर प्रदेश आणि राजस्थानातील सुट्टी

उत्तर प्रदेशात सरकारी आणि खासगी शाळांना २० डिसेंबर २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत हिवाळी सुट्टी जाहीर झाली आहे. म्हणजेच विद्यार्थ्यांना एकूण १२ दिवस सुट्टी मिळणार आहे. तर पीएमश्री शाळांमध्ये २३ डिसेंबर २०२५ ते १ जानेवारी २०२६ पर्यंत सुट्टी राहील. यूपीमध्ये यंदा सर्वात आधी व सर्वाधिक दिवसांची सुट्टी असणार आहे. राजस्थान सरकारने अधिकृतरीत्या हिवाळी सुट्टी २५ डिसेंबर २०२५ ते ५ जानेवारी२०२६ अशी जाहीर केली आहे. ही सुट्टी राज्यातील सर्व सरकारी व खाजगी शाळांना लागू राहील. डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात राजस्थानमध्ये तापमान खूप खाली जाते, म्हणून ही सुट्टी मुलांच्या हिताचा विचार करून ठेवण्यात आली आहे. दिल्ली, पंजाब, हरियाणा, चंदीगड, उत्तराखंड, मध्य प्रदेश या राज्यांमध्ये अजून अधिकृत घोषणा झालेली नाही; पण थंडी आणि धुका वाढल्यावर डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात किंवा जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात सुट्टी जाहीर होण्याची शक्यता आहे. गेल्या काही वर्षांच्या ट्रेंडनुसार या राज्यांत २५-३० डिसेंबरपासून सुट्ट्या सुरू होतात आणि १०-१५ दिवस चालतात.

२४ डिसेंबर २०२५ ला ख्रिसमस ईव्ह आणि २५ डिसेंबरला ख्रिसमसमुळे देशभर बहुतांश शाळा बंद राहतील. तसेच २४ नोव्हेंबर २०२५ ला गुरु तेग बहादुर शहीद दिवसानिमित्त दिल्ली-एनसीआर, यूपी, पंजाब, हरियाणा आदी ठिकाणी सुट्टी आहे. त्यामुळे डिसेंबरमध्ये एकूणच खूप दिवस शाळा बंद राहणार असल्याने मुलांना आराम आणि कुटुंबासोबत वेळ मिळणार आहे. पालकांनी शाळेच्या नोटिसा, वेबसाइट आणि एसएमएस तपासत राहणे आवश्यक आहे. कारण हवामानानुसार सुट्ट्या वाढवल्या किंवा बदलल्या जाऊ शकतात, याची नोंद घ्या.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

22 TO 28 DECEMBER 2025 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 12/20/2025 8:18 PM Page 1



वसईतील बडोदा एक्सप्रेस हायवेच्या बांधकामामुळे शेतकरी बाधित!

# नवसई -भाताणे गावातील शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी पर्यायी सेवा रस्ता द्या; खासदार डॉ. हेमंत सावरा यांचे केंद्रीय मंत्री गडकरी यांना पत्र!

**वसई : वार्ताहर**



वसई पूर्वपट्टीत बडोदा एक्सप्रेस हायवेच्या बांधकामामुळे बाधित झालेल्या नवसई -भाताणे गावातील शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी पर्यायी सेवा रस्ता द्या अशी मागणी पालघर जिल्ह्याचे खा. डॉ. हेमंत सावरा यांनी केंद्रीय मंत्री, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना पत्राद्वारे केली आहे. महाराष्ट्रातील पालघर लोकसभा मतदारसंघातील नवसई -भाताणे गावाजवळ बडोदा एक्सप्रेसवेचे बांधकाम वेगाने सुरू आहे. वसई पूर्वापट्टीत हे गाव महामार्गाच्या उत्तरेला आहे, तर बहुतेक शेतकऱ्यांची शेती दक्षिणेला आहे. महामार्गाच्या बांधकामामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात जाण्यासाठी पारंपारिक मार्ग पूर्णपणे बंद झाले आहेत. परिणामी, गेल्या वर्षी आणि या वर्षीच्या पावसाळ्यात शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात पोहोचण्यास मोठ्या अडचणी आल्या. महामार्ग पूर्णपणे कार्यान्वित झाल्यानंतर, त्यांच्या शेतात जाण्याचा मार्ग कायमचा विस्कळीत होईल, ज्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीविषयक कामांमध्ये व्यत्यय येईल आणि त्यांच्या उपजीविकेवर प्रतिकूल परिणाम होईल. ही बाब राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI), ठाणे (पश्चिम) कार्यालयाच्या लक्षात आणून देण्यात आली. त्यावेळी प्रकल्प संचालकांनी महामार्गाच्या दक्षिण बाजूला पर्यायी सेवा रस्ता बांधण्याचे आश्वासन दिले होते. परंतु आजपर्यंत या सेवा मार्गासाठी कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. नवसई गावातील शेतकऱ्यांना येणाऱ्या व्यावहारिक अडचणींचा विचार करून महामार्गामुळे अडवलेल्या रस्त्याऐवजी शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात पोहोचण्यासाठी पर्यायी सेवा रस्ता बांधण्याचे काम जलदगतीने सुरु करण्यासाठी संबंधित विभागांना आवश्यक मार्गदर्शन करा. आपल्या सहकार्याबद्दल आणि सार्वजनिक कल्याणासाठी सतत वचनबद्धतेबद्दल परिसरातील रहिवासी नेहमीच आभारी राहतील असेही खा. डॉ. सवरा यांनी मंत्री गडकरी यांना पत्रात म्हटले आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी तालुक्यातील २५०-३०० बाधित कुटुंबांना पुरेशी भरपाई आणि पुनर्वसन करण्याचे आश्वासन दिले. बैठकीनंतर पालघर लोकसभा खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी ही माहिती दिली. खासदार सवरा यांनी एनएच-४८ (तलासरी) वर पादचारी पूल आणि नवसई भाताणे येथील वडोदरा एक्सप्रे-वे वर शेतकऱ्यांसाठी पर्यायी सेवा रस्ता त्वरित बांधण्याची मागणी केली. मानवी सुरक्षितता आणि शेतकऱ्यांच्या उपजीविकेला प्राधान्य देण्याची मागणीही त्यांनी केली असल्याचे भाजपा ओबीसी मोर्चाचे नेते नरेश पाटील यांनी सांगितले.

# कंपनी प्लांट मध्ये अमोनिया गळती, सुदैवाने दुर्घटना टळली!



**भिवंडी : वार्ताहर**

भिवंडी तालुक्यातील मानकोली येथील एका कंपनीत सकाळी अचानक प्लांट मधून अमोनिया गळती होण्याची दुर्घटना घडली, सुदैवाने यामध्ये कोणीही जखमी झाले नसल्याने दुर्घटना टळली आहे. मानकोली परिसरात असलेल्या ब्लू ओशियन प्रा. लि. कंपनीच्या वेअरहाऊस प्लांटमध्ये शुक्रवारी सकाळी अचानक अमोनिया वायूची गळती झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते.या कंपनीत खाद्यपदार्थ व आईस्क्रीम कुलिंग करण्यात येत असल्याने मोठा साठा वेअर हाऊस मध्ये होता. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या दोन गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल होत त्यांनी पाण्याचा मारा करत हवेत पसरत असलेला अमोनिया वायू नियंत्रणात आणला. त्यानंतर येथील अमोनिया गळती थांबल्याने परिस्थिती आटोक्यात आली. सकाळ ची वेळ असल्याने या परिसरात कामगार कमी असल्याने वेळीच केलेल्या कारवाईमुळे मोठी दुर्घटना टळली आहे.

# गणवाडी, शाळा आणि घरातून गॅस सिलिंडर चोरणारे पोलिसांच्या ताब्यात



**पालघर : वार्ताहर**

पालघर तालुक्यातील सफाळे व केळवे सागरी पोलीस ठाणे हद्दीत गेल्या काही दिवसांत अंगणवाडी, शाळा आणि काही निवासस्थानी दरवाजे तोडून गॅस सिलिंडर चोरीच्या घटना वाढल्या होत्या. या सलग चोरीमागील टोळी अखेर सफाळा पोलिसांनी गजाआड केली असून चार गुन्ह्यांचा एकाचवेळी पर्दाफाश करण्यात आला आहे. सफाळे पोलीस ठाण्यात आणि केळवा सागरी पोलीस ठाण्यात चार गुन्हे दाखल करण्यात आले होते. घटनांचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक यतिश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करण्यात आले. पथकाने घटनास्थळांची पाहणी, तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे दोन आरोपी अजय एकनाथ आंबात (३२, रा. बंदाटे) व चंदू रमेश वळवी (२५, रा. देवशेत) यांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी सर्व चार चोरींची कबुली दिली. तपासादरम्यान पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून २५ गॅस सिलिंडर व एक मोटारसायकल असा एकूण १,२८,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक विनायक नरळे, उपविभागीय अधिकारी प्रभा राऊळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्ता शेळके (प्रभारी अधिकारी, सफाळे पोलीस ठाणे) आणि त्यांच्या पथकाने केली. सफाळे पोलिसांच्या या तात्काळ व प्रभावी कारवाईमुळे परिसरातील वाढलेली गॅस चोरीची मालिका थांबली असून नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# महिलेला मारवाडी साड्या वाटतो सांगून ९० हजाराला लुटले

**कल्याण : वार्ताहर**

कल्याण पूर्वेत एका पादचारी महिलेला रस्त्यात अडवून दोन भामट्यांनी या महिलेला बोलण्यात गुंतवून तिच्या जवळील ९० हजार रूपयांचा सोन्याचा ऐवज लुटून नेला. या महिलेला या भामट्यांनी एक मारवडी स्वखुशीने ज्येष्ठ नागरिकांना साड्या आणि किराणा वाटप करत आहे. आपण गरीब दिसाव्यात म्हणून आपण गळ्यातील सोन्याचा ऐवज काढून जवळील पिशवीत ठेवा, अशी दिशाभूल करत या भामट्यांनी ९० हजार रूपयांचा ऐवज लुटून नेला. सत्यवती पालाटी असे तक्रारदार आणि फसवणूक झालेल्या महिलेचे नाव आहे. त्या कल्याण पूर्वेतील चिंचपाडा रस्ता भागात कुटुंबीयांसह राहतात. त्या खासगी नोकरी करतात. सत्यवती पालाटी कल्याण पूर्व भागातील काटेमानिवली भागातील बंद असलेल्या महा ई सेवा केंद्र भागातून पायी चालल्या होत्या. त्यावेळी त्यांना या भागात दोन पादचारी दिसले. ते पुढे निघून जातील असे तक्रारदार महिलेला वाटले. ते दोघे या पादचारी महिलेच्या आड आले. त्यांनी तिला थांबविले. ते हिंदी भाषेतून सत्यवती पालाटी यांच्याशी संभाषण करू लागले. या महिलेच्या गळ्यात सोन्याचे दागिने होते. या दागिन्यांवर भामट्यांची नजर होती. सत्यवती पालाटी त्यांना टाळून पुढे जाऊ लागल्या, पण ते आग्रह करत पीडितेला सांगत होते, की आपण आमचे म्हणणे ऐका. या भागात एक मारवाडी आहे. तो स्वखुशीने ज्येष्ठ नागरिकांना साडी आणि किराणा सामान वाटप करत आहे. आपणासही साडी आणि किराणा सामान आम्ही मिळून देतो. त्यासाठी आपण आपले गळ्यातील सोन्याचे दागिने काढून जवळील पिशवीत ठेवा. अन्यथा आपणास ते सामान मिळणार नाही, असे भामट्यांनी सांगितले.

या गडबडीत दोन्ही भामट्यांनी महिलेला बोलण्यात गुंतवून त्यांना भुरळ घातली. त्यांच्या गळ्यातील सोन्याचे ९० हजार रूपये किमतीचे दागिने काढून घेऊन ते तक्रारदार महिलेच्या हातात गुंडाळी करून देत असल्याचा देखावा उभा करून हात चलाखीने ते दागिने महिलेच्या जवलील पिशवीत न ठेवता स्वताच्या ताब्यात ठेवले. या महिलेला काही अंतरावर पुढे नेत दोन्ही भामट्यांनी तेथून पळ काढला. हे दोन्ही भामटे पसार झाल्यानंतर त्यांनी आपला सोन्याचा ऐवज लुटून नेला असल्याचे समजले. त्यांनी परिसरात त्यांना शोधण्याचा प्रयत्न केला. तोपर्यंत ते पळून गेले होते. या महिलेने या लूट प्रकरणी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार केली असून पोलीस भामट्यांचे शोध घेत आहेत.

# मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या दोन कर्मचाऱ्यांना लाच घेताना रंगेहाथ अटक

**मिरा-भाईंदर : वार्ताहर**



मिरारोड पूर्वेच्या काशिमिरा हद्दीत मिरा-भाईंदर महापालिकेच्या प्रभाग कार्यालय-६ मध्ये काम करणार्या दोन कर्मचाऱ्यांना ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाच घेताना रंगेहाथ अटक केली आहे. जुने घर तोडायचे नसल्यास २५ हजार रुपये द्यावे लागतील अशी, मागणी या कर्मचायांनी केली होती. अखेर १६ हजार रुपये घेताना ठाणे घोडबंदर रोडवर चेना बसस्टॉप येथे सरकारी गाडीतच या कर्मचाऱ्यांना ताब्यात घेण्यात आले. तर पैसे देणाऱ्या खासगी व्यक्तीलाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. काशीमिरा हद्दीत असलेले एका तक्रारदार महिलेचे काजूपाडा येथे जुने घर असून ते अनधिकृत आहे असे सांगून त्यावर महापालिका कारवाई करणार आहे. कारवाई करायची नसल्यास २५ हजार द्यावे लागतील, असे सांगण्यात आले. शेवटी तडजोडी अंती १६ हजार रुपये घ्यायचे ठरले. हे पैसे ठाणे घोडबंदर रोडवर चेना सुरेखा हॉटेल येथे दुपारी स्वीकारताना अतिक्रमण विभागाचे कर्मचारी लिपिक राजेश तुकाराम कदम, सफाई कामगार सुहास किनी, आणि खासगी व्यक्ती संजय भोला साहू याला ताब्यात घेण्यात आले. तर यातील तक्रारदार महिलेचे पैसे पोहोचविणारा खासगी व्यक्ती स्थानिक कंत्राटदार आहे. तर लाचेच्या मागणीची पडताळणी ९ डिसेंबर रोजी झाली आहे. तर यातील आरोपी राजेश कदम यांना सप्टेंबरमध्ये पदोन्नती शिपाई पदावरून लिपिक पदावर पदोन्नती दिली होती. सदरची कारवाई ही ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पोलीस अधीक्षक शिवराज पाटील, अपर पोलीस अधीक्षक सुहास शिंदे, भागवत सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सचिन मोरे , शर्मिला पाटील, पोलीस नाईक बाळू कडव, पोलीस हवालदार रवींद्र सोनवणे, महिला पोलीस हवालदार मनीषा औटी आणि दशरूणा गावित यांनी कारवाई केली आहे.

# अंमली पदार्थांची तस्करी करणारी आंतरराज्य टोळी अटकेत

## १४ तस्करांपैकी सात जण अटकेत, सात जणांचा शोध सुरू

**कल्याण : वार्ताहर**





गांजाची तस्करी करणाऱ्या एका आंतरराज्य टोळीचा छडा लावण्यात महात्मा फुले पोलीस ठाणे आणि कल्याण वाहतूक विभागाच्या पोलिसांना यश आले आहे. या टोळीतील एकूण १४ तस्करांपैकी सात जणांना अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. सात फरार तस्करांचा पोलीस शोध घेत आहेत. या टोळीला मकोका लावण्यात आला आहे. मकोका अंतर्गत कल्याण पोलिसांनी केलेली ही दुसरी मोठी कारवाई आहे, असे कल्याणचे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी सांगितले. अंमली पदार्थ घेऊन येणारे एक संशयास्पद कल्याणमधील वालधुनी पुलावरून येत आहे. अशी गुप्त माहिती ऑगस्टमध्ये कल्याण पोलिसांना मिळाली होती. महात्मा फुले पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बळीरामसिंग परदेशी, वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिलिंद झोगडे यांच्या पथकाने वालधुनी भागात रात्रीच्या वेळेत सापळा लावला होता. वालधुनी पुलावरून छत्तीसगड आरटीओ मंजूर असलेली वाहन क्रमांकाची एक मोटार जात होती. पोलिसांनी या वाहनाला थांबविण्याचा प्रयत्न केला. तो वेगाने पुढे गेला. हीच संशयित मोटार असावी म्हणून पथकाने मोटारीचा पाठलाग केला. हवालदार सोनवणे यांनी मोटारीचा पाठलाग करून त्या वाहनाला अडविण्याचा प्रयत्न केला. मोटार चालकाने सोनवणे यांच्या अंगावर वाहन घालून त्यांना जीव मारण्याचा प्रयत्न केला. पथकाने ही कार शिताफीने अडवली. त्यात ३५ किलो गांजा, गावठी पिस्तुल आढळले होते, असे उपायुक्त झेंडे यांनी सांगितले. या मोटारीतून पोलिसांनी मोहम्मद आसिफ, मोहम्मद शेख, फैजान शेख, समीर अली, आसिफ सय्यद यांना अटक केली होती. त्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी भिवंडी, नागपूर, ओरिसा राज्यातून शाहिद अब्दुलगनी शेख, शाहीद शेख, रवींद्र मिर्धा यांना अटक केली होती. उर्वरित सात फरार तस्करांचा पोलीस शोध घेत आहेत. या १४ जणांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. ही टोळी नागपूर, अमरावती, भंडारा, ठाणे जिल्ह्याच्या विविध भागात अंमली पदार्थांची तस्करी करत असल्याचे तपासात पुढे आले आहे.

या आरोपींविरूध्द नागपूर शहर पोलीस ठाण्यात अंमली पदार्थ तस्करी प्रकरणी एकूण ४० हून अधिक गुन्हे दाखल आहेत. या टोळीकडून साडे आठ किलो किमतीचा एकूण ३५ किलो गांजा जप्त करण्यात आला होता. ओरिसा राज्यातून गांजाची अधिक प्रमाणात खरेदी करून ते हा गांजा महाराष्ट्रातील ठाणे, नागपूर, मुंबई, नाशिक शहरात विक्री करत होते, असे पोलीस तपासात पुढे आले आहे. ही कारवाई साहाय्यक आयुक्त कल्याणजी घेटे, पोलीस निरीक्षक विजय नाईक, उपनिरीक्षक विजय मडके, हवालदार धेरे, सोनवणे यांच्या पथकाने केली.



# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज करावेत

**लातूर : वार्ताहर**

शासकीय वसतिगृहात प्रवेशास पात्र असूनही प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिक्षण घेता यावे, यासाठी राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यात येते. यामध्ये भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा या विद्यार्थ्यांना स्वत: उपलब्ध करून घेण्यासाठी आवशयक रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट वितरीत करण्यात येते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्यास ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ज्या विद्यार्थ्यांचे डमिशन उशीरा झाले आहे व ज्या विद्यार्थ्यांना तांत्रिक कारणामुळे महाआयटी पोर्टलवर स्वाधार योजनेचा ऑनलाईन अर्ज भरता आला नाही, अशा विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता यावा, यासाठी शासनाने मुदतवाढ दिली आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात महाआयटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज केलेला आहे, त्या विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेची रक्कम आधार सलंग्न बँक खात्यावर थेट जमा करण्यासाठी बँक डिटेल्स भरण्याचा टॅब उपलब्ध करून देण्यात आला आहे. तरी सर्व विद्यार्थ्यांनी त्वरीत महाआयटी पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने बँक डिटेल्स भरुन बँक पासबुक अपलोड करुन घ्यावे, असे समाज कल्याण सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी कळविले आहे.

## थोडक्यात वृत्तांत



### भिवंडी ते नवी मुंबई विमानतळ पायी एल्गार मोर्चास पोलिसांनी परवानगी नाकारली

भिवंडी : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते स्व.दि.बा. पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीसाठी २२ ते २४ डिसेंबर रोजी भिवंडीतील मानकोली ते नवी मुंबई विमानतळा पर्यत पायी एल्गार मोर्चाचे आयोजन भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले आहे. मात्र या आंदोलनाला मनपा निवडणुकीच्या आचारसंहितेचे कारण देत नारपोली पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. राज्यभर निवडणूक आचारसंहिते लागली असल्याने आचारसंहितेच्या काळात आंदोलनाला परवाणगी देता येणार नसल्याचे लेखी पत्र नारपोली पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजय कादबाने यांनी खा. बाळ्या मामा यांना पाठवले आहे. त्यामुळे या आंदोलनाबाबत खासदार बाळ्या मामा व स्थानिक भूमिपुत्र आंदोलन समिती पदाधिकारी नेमकी काय भूमिका घेतात हे पाहणे गरजेचे आहे.

### एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यासाठी मुदतवाढ

लातूर : वाहनांच्या नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करुन होणारे गुन्हे कमी करणे, रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांची ओळख पटविणे व तसेच राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व वाहनांना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी व नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून १ एप्रिल २०१९ पूर्वी उत्पादित वाहनांना एचएसआरपी बसविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यानुसार लातूर जिल्ह्यातील १ एप्रिल २०१९ पूर्वी उत्पादित वाहनांना एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्याची कार्यवाही पूर्ण करण्यासाठी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांना हाय सिक्युरीटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसविण्याबाबत शासनाद्वारे नियुक्त करण्यात आलेले अधिकृत एचएसआरपी फिटमेंट सेंटरर्स येथे क्ष्ठझ बसविण्याची कार्यपध्दती व इतर सर्वप्रकारची माहिती विभागाच्या https://www.transport.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी लातूर जिल्ह्यातील वाहन वाहनधारकांनी या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने शुल्क भरून ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी एचएसआरपी नंबर प्लेट बसवून घ्यावी, असेही आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आशिषकुमार अय्यरकंकरेज यांनी केले आहे.

### जात वैधता पडताळणीसाठी स्वतंत्र कक्ष

लातूर : लातूर मनपा सार्वत्रिक निवडणुकीत जात वैधता करण्यासाठी अर्ज स्वीकारून ते अर्ज जात पडताळणी समितीकडे पाठवण्यासाठी लातूर मनपात स्वतंत्र कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. मनपाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यानुसार आयोगाने निश्रि्चत केलेल्या आरक्षित जागांवर निवडणूक लढविणाऱ्या इच्छुक उमेदवारंचे जात वैधता करून घेणे आवश्यक असते. त्यासाठी अर्ज करावा लागतो.असे अर्ज स्वीकारून ते जिल्हा जात पडताळणी समितीकडे पाठविण्यासाठी महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात हा स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाच्या माध्यमातून दि.२२ डिसेंबर ते ३० डिसेंबर या काळात अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. हे अर्ज जिल्हा जात पडताळणी समितीकडे पाठविले जाणार आहेत. आरक्षित जागांवर निवडणूक लढविणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज या कक्षाकडे आवश्यक कागदपत्रांसह संतोष लाडलापुरे व फजल शेख यांचेकडे सादर करावेत, असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

### विद्यार्थीने जिंकले २ लाखांचे रोख बक्षीस

लातुर : नुकतेच गिटहब या संकेतस्थळातर्फ आयोजित हॅकेथॉन स्पर्धत एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संगणक शास्त्र विभागाच्या अंतिम वर्षाचा विद्यार्थी यशवर्धन धोंडगेने प्रथम व तृतिय पारितोषिक पटकावत तब्बल अनुक्रमे १,५०,००० व ५०,००० रु. रोख पारितोषिक जिंकले आहे. ही स्पर्धा प्रोग्रामींग लँग्वेज वापरून प्रोजेक्ट बनवण्याची होती. या स्पर्धेमध्ये इतर देशातील विद्यार्थी सुध्दा सहभागी झाले होते. त्याच्या या दैदिप्यमान यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील चिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजय रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे, संचालक राजेश्वर बुके, बस्वराज एरटे, काशिनाथ साखरे, सौ. ललिताताई पांढरे, महेश हलगे, बाबुराव तरगुडे, गुरुलिंग धाराशिवे यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. याप्रसंगी महाविद्यालयाचे परिसर संचालक डॉ मोहन बुके, प्राचार्य डॉ एस.एम.जगदे, उपप्राचार्य प्रा विरभद्र बाळे, निबंधक डॉ सौ ज्योती पाटील, संगणक विभाग प्रमुख डॉ एन एम हलगरे, प्राध्यापक व कर्मचारी यांनी यशवर्धनचे अभिनंदन व कौतुक केले आहे.

### इमारतीचा सज्जा कोसळून दुर्घटना

विरार : विरार पश्चिमेकडील विराट नगरातील आदित्यनाथ इमारतीचा सज्जा कोसळून दुर्घटना घडली आहे. बुधवारी सायंकाळी आठच्या सुमारास ही दुर्घटना घडली. या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. पालिकेच्या अग्निशमन जवानांनी घटनास्थळी पोहोचून इमारतीतील नऊ कुटुंबांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. आदिनाथ इमारत ही ३५ वर्षे जुनी असल्याचे बोलले जात आहे. पालिकेच्या प्रभाग समिती 'ए'चे सहाय्यक आयुक्त यांनी इमारत जुनी असल्याची इमारतीतील नागरिकांना नोटीस दिली होती. तत्काळ इमारतीचे लेखापरीक्षण करून इमारतीचा अहवाल सादर करावा अशी नोटीसमध्ये सांगण्यात आले होते. आदित्यनाथ इमारतीत एकूण ११ सदनिका आहेत, त्यापैकी ९ सदनिकांमध्ये सततची वर्दळ असलेली कुटुंबे वास्तव्यास होती. कोसळलेला सज्जा हा इमारतीच्या बाहेरील भागाचा असल्याने मोठा अनर्थ टळला. मात्र इमारतीच्या तळमजल्यात असलेल्या काही गाळ्यांना मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. गाळ्यांचे शटर, स्टोअरेज सामग्री तसेच काही घरगुती व्यवसायांचे सामान यांचे नुकसान झाल्याची माहिती मिळते.

22 TO 28 DECEMBER 2025 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 12/20/2025 8:19 PM Page 1



पान १ वरून....

## दीडशेच्या उधरीवरून वाद ...

अटक केली आहे. दुकानातून अवघ्या १०० ते १५० रुपयांचे किराणा साहित्य उधार न दिल्यावरून शिवीगाळ केल्याच्या रागातून शहापूरमध्ये एकाची हत्या करण्यात आली आहे. याप्रकरणी एकाला ठाणे ग्रामीण पोलिसांनी एकाला अटक केली असून विठ्ठल पारधी (वय ३६) असं आरोपीचं नाव आहे. ठाणे जिल्ह्यातील शहापूरतालुक्यातील कळमगांवातील खरमेपाडा येथे ७ डिसेंबर रोजी ओढ्यात एक मृतदेह आढळला होता. हा मृतदेह वाशाळा येथील बाळू वीर (वय ४२) याचा असल्याचं समोर आलं. याप्रकरणी शहापूर पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल झाल्यानंतर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने या गुन्ह्याचा समांतर तपास चालू केला. शहापूर पोलिसांचे पथक तपास करत होते. चौकशीमध्ये हा गुन्हा विठ्ठल पारधी याने केल्याचं उघड झालं. पारधी याच्या किराणा दुकानातून किराणा साहित्य उधार दिलं नाही म्हणून वीर याने पारधी आणि त्याच्या पत्नीला शिवीगाळ केली होती. याच रागातून वीर याच्या डोक्यात फटका मारला. त्यामुळे गंभीर दुखापत झालेल्या वीरला खांद्यावरून घेऊन जात पाण्याच्या ओढ्यात टाकले. त्याच्यावर दगड ठेवून हत्या केल्याची कबुली पारधीने दिल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## जमिनीच्या वाटणीसाठी कृतघ्न मुलगा...

अप्पर पोलिस अधिक्षक विक्रम गायकवाड यांनी घटनास्थळी भेट दिली. मुलगा संजय भोसले यांच्या फिर्यादीवरून पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिस निरीक्षक निंगाप्पा चौखंडे अधिक तपास करीत आहेत.आईची समजूत काढली मंगळवारी (१६) सुनिलने आईकडे खुन्नसने बघून शड्डू ठोकला व शिवीगाळ केल्याचे विजयमाला यांनी मुलगा संजयला सांगितले होते. मात्र, त्याच्याकडे लक्ष देवू नको असे सांगून त्याने आईची समजूत काढली होती.स्वत: पोलिस ठाण्यात हजर११२ क्रमांकावर फोन करून मी आई-वडिलांचा खून केला आहे, अशी माहिती सुनीलने स्वत: पोलिसांना दिली आणि ठाण्यात हजर झाला. वडिलांच्या डोक्यावर दांडक्याने प्रहार करताना शोकेसची काच फुटली. त्याच काचेने त्याने आई-वडिलांच्या हाताच्या नसा कापल्या. त्यामुळे दोघेही रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. आईच्या अंथरूणात तुटलेले मंगळसूत्र आणि बांगड्यांचा खच पडला होता.बघ्यांनाही धमकीशांत डोक्याने आई-वडीलांचा खून केल्यानंतर खूनाचा पुरावा नष्ट करण्यासाठी सुनिलने बांबूचे दांडके, विळ्याचे पाते बाथरूममध्ये धुतले व आपल्या शेडजवळील दरवाजाच्या भिंतीलगत ठेवले. त्यानंतर गेट बंद करून घराबाहेर निर्वीकारपणे बसला होता. कुणी घराजवळ आल्यास त्यांना दगड फेकून मारण्याची धमकी देत होता. त्यामुळे घराजवळ जायला कुणी धाडस करत नव्हते.

चुलत वहिणीलाही फरशी फेकून मारलीपहाटे पावणे सहाच्या सुमारास घरात आरडाओरडा ऐकू येत असल्यामुळे शेजारी राहणाजया चुलत वहिणी राजमाता यांनी घरात भांडण सुरू असल्याचे संजय यांना फोनवरून कळवले. त्यानंतर नेमके काय घडले हे बघायला गेलेल्या राजमाता यांनाही सुनिलने फरशीचा तुकडा फेकून मारला.आक्रोश हृदय पिळवटून टाकणारासुनिलचे बंधू संजय हे सोनारकाम करतात. व्यवसायानिमित्त ते भुदरगड तालुक्यातील वेंगरूळ येथे राहतात. तर ज्येष्ठ बंधू चंद्रकांत हे भुदरगड तालुक्यातील पिंपळगाव येथे राहतात. घटनेची माहिती मिळताच दोघेही कुटुंबियांसह हुपरीत पोहचले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या आई-वडीलांना पाहून त्यांनी केलेला आक्रोश हृदय पिळवटून टाकणारा होता.अबालवृद्धांनाही हुंदका भोसले कुटूंबियांचा चरितार्थ चांदी उद्योगावरच चालत असे. दरम्यान, चंद्रकांत याने पिंपळगावमध्य तर संजय याने गारगोटीमध्ये ज्वेलर्सचे दुकान सुरू केले. सुनिलचे वागणे विचीत्र असल्यामुळे त्याची पत्नी मुलाबाळांसह माहेरी बेळगावला राहते. त्यामुळे खाजगी नोकरी करत तो एकटाच राहत होता. नारायण भोसले यांना परिसरातील अबालवृद्ध काका म्हणून हाक मारत. विवाह जुळवून त्यांनी अनेकांचे संसार फुलविले. मात्र, पोटच्या मुलानेच त्यांची जीवनयात्रा संपवली. त्यामुळे घटनास्थळी जमलेल्या अबालवृद्धांनाही हुंदका आवरत नव्हता.

## चारित्र्याच्या संशयाने पती झाला ...

महेशवाडगी हे आपल्या कुटूंबासमवेत राहयला आहेत.त्याची ही शेती गावात असल्याने ते गावातील सधन म्हणून ओळखले जातात. गेल्या चार पाच वर्षापुर्वी त्यांनी आपला मुलगा भरतेश याचा विवाह लक्ष्मी बरोबर समाजाच्या रितीरिवाजाप्रमाणे केला.लक्ष्मी ही तशी दिसायला सुंदर नसली तरी बऱ्यापैकी होती. सुरूवातील महेशवाडगी यांनी तिला सांभाळून घेतले. परंतु एक दोन वर्षातच तिची सासु पद्मावती ही तिला त्रास देवू लागली. या ना त्या कारणातून ती लक्ष्मीला टोचून तिचा पदोपदी अपमान करीत होती.माझ्या मुलग्याला तुझ्यापेक्षा देखणी सुंदर मुलगी मिळाली असती, त्यांनी आम्हाला लग्नात हुंडा ही मोठा दिला असता असे ती तिला म्हणत होती.सासु आपल्याला टोचून बोलते आपल्या माहेरच्यांनी हुंडा दिला नाही म्हणून सारखी भांडण करते याचा लक्ष्मीला राग येत होता. सासु आपल्याला त्रास देत आहे. हुंडा दिला नाही म्हणून नको नको ते बोलत आहे असे तिने आपला नवरा भरतेश याला सांगितले. परंतु त्याने ही तिच्या सांगण्याकडे लक्ष न देता तुच माझ्या अशई वडिलाशी भांडण करत असतेस असे तिला सुनावले. त्यातच भरतेश हा अलिकडे आपल्या मित्रांच्या संगतीने दारू पित असल्याने तो घरी दारू पिऊन आला की हमखास तो बायको लक्ष्मी बरोबर भांडण काढून तिला मारहाण करीत अर्वाच्च भाषेत शिव्या ही देत होता.त्यामुळे सासरी होणारा त्रास लक्ष्मीने आपल्या माहेरच्या लोकांना सांगितला. त्यावेळी तिच्या माहेरच्या लोकांनी ही मुलगी लक्ष्मी हिचीच समजुत काढून संसारात भांडयाला भांडे लागणार त्यात गैर काही नाही तु उगीच काही काळजी करूनकोस आम्ही तुझ्या नवऱ्याला आणि सासु सासऱ्यांना समजावून सांगतो अशी तिची समजुत घातली होती. त्यातच एकदा भरतेश हा लक्ष्मीच्या माहेरी गेला असता तिच्या माहेरच्या लोकांनी त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला परंतु भरतेश याने उलट त्यांनाच तुमच्या मुलीचे बाहेर कोणाबरोबर तरी लफडे आहे तुमची मुलगी लफडे बाज आहे तुम्ही मला आणि माझ्या घरच्या लोकांना फसविले आहे म्हणून त्याच्याशीच भांडण करीत त्यांनाच शिवीगाळ केली. त्यामुळे लक्ष्मीच्या माहेरच्या लोकांनी भरतेशला समजावून सांगण्याचे थांबविले. कसे तरी मुलगी लक्ष्मीची समजुत काढून त्यांनी तिला त्याच्याबरोबर तेरदाळ येथे पाठवून दिले. तेरदाळ येथे आल्यावर देखील लक्ष्मीचा त्रास काही कमी होत नव्हता. नवरा भरतेश तर तिच्या चारित्र्यावर संशय घेत तिलाच अर्वाच्च भाषेत शिव्या देत मारहाण करीत होता. त्यामुळे आपल्या आई वडिलांनी आपले काही चांगले केले नाही. त्यांनी चांगले स्थळ बघून दिले नाही, माझा केसाने गळा कापला असे ती म्हणत होती. पण तिचे ऐकणार तरी कोण होते. सासु पद्मावती ही नेहमी मुलगा भरतेशचे कान भरत होती. त्यामुळे तो जास्तच बायकोवर चिडत होता. हल्ली तो कामावर ही नीट जात नव्हता. उलट मित्रांच्या संगतीने दारू पित दिवस ढकलत होता. त्यामुळे लक्ष्मीला संसार करणे अवघड झाले होते. ती ही भांडून किती दिवस आपल्या माहेरी जाणार होती.कारण तिच्या माहेरची परिस्थीती ही बेताचीच होती. त्यामुळे सासु आणि नवऱ्याचे बोलणे खात त्याचा मार सहन करीत ती कसे बसे दिवस काढत होती. सासु पद्मावती ही नवरा बायकोच्या भांडणात तेल ओतण्याचेच काम करीत होती.तिला लक्ष्मीच्या माहेरच्या लोकाकडून मानपान आणि हुंडा पाहिजे होता तरच ती सुन लक्ष्मीला नांदावयाला तयार होती. या कारणातून ती सारखी तिला हिडीस फिडीस करून त्रास देत होती. भरतेश याला लवकर राग येत होता. खरे तर त्याचा स्वभाव हा रागीट होता. बायकोने उलटे बोलले त्याला खपत नव्हते. लक्ष्मी ही हल्ली जरा धीट झाली होती. रोजचा नवऱ्याचा मार तिच्या अंगवळणी पडल्याने भांडणात ती ही संयम न राखता भरतेश बरोबर वाद घालत जशास तसे उलट बोलून उत्तरे देत होती. याचा राग त्याला येत होता. त्यामुळे भांडणात आणि दारूच्या नशेत तो हातात सापडेल त्या वस्तुने तिला मारहाण करीत होता. खरे तर नवरा बायकोच्या भांडणात कुणी पडून नये असे म्हणतात परंतु महेशवाडगी याच्या घरात लक्ष्मी आणि तिच्या नवऱ्याची भांडणे ही नित्याचीच झाली असल्याने शेजाऱ्यांनी ही बऱ्याच वेळेला त्याची समजुत काढली परंतु भरतेश याचा स्वभाव त्याला नडत होता. त्याला राग सहन होत नव्हता. भांडणात रागाच्या भरात त्याचा संयम सुटत होता. त्यामुळे हल्ली शेजाऱ्यांनी आणि नातलगांनी ही त्यांना समजावून सांगणे बंद केले होते. त्याचे भांडण कधी विकोपाला जाईल हे काही सांगता येत नव्हते. दारू पिणारी व्यक्ती ही अंगात दहा हत्तीचे बळ आल्यासारखे वागत असते त्यामुळे सहसा त्याच्या नादाला कुणी लागत नाही अगदी तसेच भरतेश बाबत ही झाले होते. त्याला कुणी काही सांगायला गेले की उलट तोच त्यांना दारूच्या नशेत शहाणपणा सांगत असायचा. मागील आठवडयात तो कामावर गेलाच नाही, मित्रांच्या बरोबर दारू पिऊन त्याने दिवस काढले. त्यामुळे त्याचा वाद बायको लक्ष्मीबरोबर सुरू व्हयचा. तो तिच्यावर संशय घेऊन तिला मारहाण करू लागला की,ती ही त्याला कन्नडमध्ये शिव्या शाप देत गंडग्या, भाडया म्हणत, उच्ची कुडयेग असे म्हणत ती त्याच्या वर्मावर बोट ठेवत होती. त्यामुळे तो तिच्यावर चिडयाचा. रात्री भांडणात तिने आपली जीभ सैल सोडली. तो ही दारूच्या नशेत तर्र होता. त्याला काही सुचत नव्हते. भांडणात तिने त्याला ही शिव्या देत नको ते बोलले असल्याने त्याच्या रागाचा पारा जास्तच चढला. तो तिला हातात सापडेल त्या वस्तुने मारू लागला. तिला त्याने लाथा बुक्क्यांनी मारहाण करीत खाली पाडले. तशी ती त्याचा मार सहन करीत ओरडत होती. तिच्या ओरडण्याने आणि रडण्याने त्याला काही फरक पडलेला नव्हता. त्याचे भांडण सोडवायला त्यावेळी भरतेशची आई आणि घरातील इतर लोक ही आले परंतु भरतेशची आई पद्मावती हिने लक्ष्मीला न सोडविता भरतेशलाच चिथावणी देत ही भवानी चांगली नाही, आपल्या घरादाराचे नाव खराब करत आहे असे म्हणाली. आईच्या चिथावणीने भरतेश आधिकच पिसाळला. आधीच दारूची नशा त्याच्या डोळ्यात होती. त्याचे डोळे लालबुंद झाले होते. इग ना निंग बिडूल असे कन्नडमध्ये त्याने लक्ष्मीला म्हणाला. नवरा आता आपल्याला सोडत नाही असे म्हटल्यावर देखील ती गप्प बसली नाही, ती रडत रडत सासु नवऱ्याला रागाच्या भरात बोलू लागली. भरतेश याने नशेतच स्वयंपाक घरातून कात्री आणली आणि रागा रागाने लक्ष्मीचे केस ओढत तिच्या पोटात जोरात खुपसले. त्यासरशी ती ओरडली तिच्या पोटातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. तो त्यावेळी तेवढयावरच थांबला नाही त्याने त्याच कात्रीने तिच्या मानेवर ही घाव घातला परंतु तो घाव चुकला त्याने परत तिच्या पोटात कात्री खुपसली मर साली म्हणत कन्नड मध्ये म्हणत तो घरातून बाहेर आला.इकडे लक्ष्मीच्या मदतीला घरातील कुणीच आले नाही. त्यातच मोठया प्रमाणात रक्तस्त्रव झाल्याने लक्ष्मीचा जागीच मृत्यु झाला. या घटनेची माहिती शेजाऱ्याना समजताच त्यानी महेशवाडगी यांच्या घरात जावून बघितले.लक्ष्मीला तिच्या नवऱ्याने मारून टाकल्याची बातमी बघता बघता घुमट गल्लीत आणि तेरदाळ गावात पसरली.रात्री उशिरापर्यंत गावातील पोलीस पाटलांनी घटनास्थळी धाव घेत या घटनेची माहिती घेतली. घटनास्थळी बघ्यांची गर्दी वाढली होती. भरतेशचे आई वडिल घरातून बाहेर गेल. घराच्या बाहेर भरतेश हा हाताश होऊन आपल्या डोक्याला हात लावून बसला होता. कुणी तरी या घटनेची माहिती तेरदाळ पोलीस पाटलांनी तेरदाळ पोलीस स्टेशनला कळविली. पीएसआय सिंगणणावर यांनी आपल्या सहकार्यासह घटनास्थळी भेट देवून पाहणी केली. ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे यातील संशयीत आरोपी कोण आहे याची माहिती पोलीसांना मिळाली होती. तेरदाळ पोलीसांनी या घटनेची माहिती मयत लक्ष्मी हिच्या माहेरच्या लोकांना दिल्यावर ते ही तेरदाळ येथे रात्री उशिरा दाखल झाले. त्यांनी जावाई आणि त्याची आई पद्मावती याच्यावर आरोप करून आपल्या मुलीच्या मृत्युला जावाई भरतेश महेशवाडगी हाच नसुता जबाबदार नसून त्याची आई मद्मावती हिने चिथावणी दिली असल्याने ती ही याला जबाबदार असल्याचे पोलीसांना सांगितले. घटनास्थळी बागलकोट जिल्हा पोलीस प्रमुख सिध्दार्थ गोयल यांनी भेट देवून या घटनेची माहिती घेतली. त्यांनी तेरदाळ पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या. या घटनेचा पंचनामा तेरदाळ पोलीसांनी करून लक्ष्मीचा मृतदेह तेरदाळ येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेची फिर्याद मयत लक्ष्मीच्या माहेरच्या लोकाकडून पोलीसांनी घेतली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी तेरदाळ पोलीस ठाण्यात लक्ष्मी भरतेश महेशवाडगी (वय २४) हिच्या खुन प्रकरणी आयपीसी कलम १०३(१) प्रमाणे तिचा नवरा भरतेश पारिसा महेशवाडगी (वय २८) रा.दोघे ही तेरदाळ याच्या विरोधात गुन्हा दाखल केला. त्याला दुसऱ्या दिवशी जमखंडी येथील कोर्टात पोलीसांनी उभे केले असता मा.न्यायालयाने त्याची रवानगी जिल्हा कोर्टात केली. दरम्यान तेरदाळ पोलीसांनी भरतेश महेशवाडगी याच्याकडून गुन्हयात वापरलेली कात्री जप्त केली. या घटनेचा पुढील तपास पीएसआय सिंगणणावर याच्या मार्गदर्शनाखाली तेरदाळ पोलीस करीत आहेत.

## रोजच्या भांडणाचा दुखद शेवट ...

पतीला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे. दररोज होणाऱ्या भांडणात तिचा पती कृष्णा पवार (४०) महिलेला केसांनी धरून बाथरूममध्ये ओढत नेत तासनतास मारहाण केल्याचा आरोप आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी दुपारी ४ ते रात्री १० च्या दरम्यान ही घटना घडली. हल्ल्यानंतर आरोपी पती दारूच्या नशेत घरातच राहिला. २०४ क्रमांकाच्या खोलीत राहणारा राजेंद्र आगरे (३३) याला घटनेची माहिती मिळाली आणि त्यांनी तातडीने ११२ वर फोन करून पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच विरार पोलिसांचे वरिष्ठ अधिकारी, डीबी टीम आणि इतर पोलीस कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी मृतदेहाचा पंचनामा (तपास) केला आणि आरोपी पती कृष्णा पवारला ताब्यात घेतले आहे. गुरुवारी चौकशी केल्यानंतर त्याला औपचारिकरित्या अटक करण्यात आली. पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या कलम १०३(१) अंतर्गत हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक एल.एम. तुरे यांनी सांगितले की, मृत महिलेच्या डोक्याला आणि कानाला गंभीर दुखापत झाली होती, ज्यामुळे तिचा मृत्यू झाला.

## जमिनीच्या वाटणीचा वाद प्राणावर ...

केले तरी पुरेसे असते. मात्र कित्येकदा तसे होत नाही. एखादी पिढी प्रसंगी कष्ट करुन तर एखादी पिढी कोणत्याही मार्गाने मालमत्ता उभी करते. नंतरच्या पिढीत मात्र मालमत्तेवरुन गंभीर स्वरुपाचे वाद होण्याच्या घटना आपण बघत असतो. जळगाव जिल्ह्याच्या रावेर तालुक्यातील कुसुंबा या गावी अशीच एक घटना घडली. जन्मदात्या बापानेच आपल्या मुलाचे हातपाय बांधून त्याच्या डोक्यावर लाकडी मोगरीने वार करुन हत्या केली. या घटनेमागे मालमत्तेच्या मागणीची धारदार किनार होती. मद्यपी मुलाच्या मालमत्तेत हिस्सा मागणीच्या त्रासाला वैतागून बापाला हे पाऊल उचलावे लागले. मध्य प्रदेशच्या सिमेवर जळगाव जिल्ह्यातील रावेर तालुका वसलेला आहे. शेती हा या तालुक्यातील रहिवाशांचा प्रमुख व्यवसाय आहे. या तालुक्यातील कुसुंबा या गावी रविंद्र भगवान पाटील हा शेतकरी राहतो. रविंद्र पाटील याची पहिली पत्नी मरण पावली असून तिच्यापासून त्याला सचिन नावाचा मुलगा आणि पुजा नावाची मुलगी आहे. मुलगी पुजाचे लग्न झाले असून ती तिच्या सासरी राहते. पहिल्या पत्नीच्या निधनानंतर रविंद्र पाटील याने दुसरे लग्न केले. दुस-या पत्नीपासून रविंद्र यास अभिषेक नावाचा मुलगा आहे. अशा प्रकारे रविंद्र यास दोघा पत्नीपासून एकुण तिन अपत्य झाले. पहिल्या पत्नीचा मुलगा सचिन हा बालपणापासून सुरत येथे त्याच्या मामाच्या गावी राहतो. अविवाहीत सचिन हा अधुनमधून गावी कुसुंबा येथे रविंद्रला भेटण्यासाठी येत होता. गावी आला म्हणजे सचिन हा बाप रविद्रकडे शेत आणि मालमत्तेत हिस्सा मागत असे. त्याच्या नेहमीच्या मागणीला वैतागून रविंद्रने सचिन यास मालमत्ता न देता रिक्षा विकत घेऊन देत रोजगार मिळवून दिला. रावेर ते कुसुंबा या मार्गावर प्रवासी रिक्षा चालवून सचिन अर्थार्जन करत होता. मात्र तरीदेखील त्याची मालमत्तेत हिस्सा मिळण्यासाठी बाप रविंद्रकडे कुरबुर सुरुच होती. दिवसेंदिवस सचिनची ही कुरबुर वाढतच होती. कधी कधी सचिन घरी येण्यापुर्वी मद्यपान करुन घरी येत होता. मद्याच्या नशेतच तो बापाकडे शेतासह मालमत्तेत हिस्सा मिळण्यासाठी वाद घालत असे. सचिन यास मद्याचे व्यसन असल्यामुळे त्याचे वडिल त्याला मालमत्तेत हिस्सा देण्यास तयार नव्हते. त्यामुळे पिता पुत्रातील वाद दिवसेंदिवस वाढत होता. अखेर मद्यपी सचिनच्या जीवनातील अखेरची रात्र त्याच्यासाठी काळरात्र बनून आली. दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ हा दिवस नेहमीप्रमाणे उजाडला. या दिवशी रात्री दहा वाजता सचिन रावेर येथून मद्यपान करुनच घरी आला. घरात आल्या आल्या त्याने बाप रविंद्रकडे मालमत्तेत हिस्सा मागण्यास सुरुवात केली. पिता पुत्रातील हा वाद एवढा विकोपाला गेला की रविंद्र पार वैतागला. मद्याच्या नशेतील सचिनला आपण काय बोलत आहोत याचे भान नव्हते. अखेर वैतागलेल्या रविंद्रने मद्याच्या नशेतील सचिनचे दोरीने हातपाय घट्ट बांधले. त्यानंतर संतापाच्या भरात त्याने लाकडी मोगरी घेऊन ती सचिनच्या डोक्यात हाणली. या जीवघेण्या हल्लयात सचिनच्या डोक्यातून रक्तस्त्राव सुरु झाला आणि त्याची हालचाला काही वेळातच बंद झाली. अशा प्रकारे सचिनच्या रोजच्या त्रासातून बाप रविंद्रने सुटका करुन घेतली. आता जे होईल ते बघून घेऊ असा त्याने मनाशी विचार केला आणि तो रात्रभर मुलगा सचिनच्या मृतदेहाजवळ शांतपणे बसून राहिला. मंगळवार १८ नोव्हेंबरचा दुसरा दिवस उजाडला. सकाळ होताच रविंद्रने पोलिस पाटील सईस तडवी यांना फोन लावून घटनेची माहिती देत घरी त्यांना घरी बोलावून घेतले. माहिती मिळताच पोलिस पाटील तडवी यांनी रविंद्रचे घर गाठले. घटनास्थळी मयत अवस्थेतील सचिन हा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला त्यांना दिसून आला. त्याच्या मृतदेहाजवळच रक्ताने माखलेली लाकडी मोगरी, मद्याची बाटली व ग्लास असे साहित्य पडलेले होते. या धक्कादायक घटनेची माहिती पोलिस पाटील सईस तडवी यांनी रावेर पोलिस स्टेशनला कळवली. माहिती मिळताच रावेर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक डॉ. विशाल जायस्वाल यांनी घटनास्थळी आपल्या सहका-यांसह धाव घेतली. पोलिस पथकाने लागलीच संशयीत आरोपी रविंद्र पाटील यास ताब्यात घेत पुढील कायदेशीर कारवाईला सुरुवात केली. पोलिस पाटील तडवी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार रावेर पोलिस स्टेशनला या घटनेप्रकरणी संशयीत आरोपी रविंद्र पाटील याच्याविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. रविंद्र पाटील यास अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरु आहे.

## जावयानेच साधला अचूक नेम...

बालकाला देखील ताब्यात घेण्यात आले आहे, अशी माहिती पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना दिली. सागर रामेश्वर केसापुरे (वय २०, रा. देऊळगाव राजा, जि. बुलढाणा), ऋषिकेश सखाराम गायकवाड (वय २२, रा. दुधड, जि. छत्रपती संभाजीनगर) असे अटक आरोपींची नावे आहेत. तर या प्रकरणात एका विधी संघर्ष बालकाचा देखील समावेश असल्याचे पोलिसांनी नमूद केले. १५ डिसेंबर रोजी पैठण तालुक्यातील पाटेगाव येथील गोदावरी नदीच्या पुलाखाली प्लास्टिकच्या गोणीत हातपाय बांधलेला आणि गळ्याला फास दिलेल्या अवस्थेतील एक मृतदेह आढळून आला होता. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली. या प्रकरणी पैठण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल होताच स्थानिक गुन्हे शाखेने तपासाची सूत्रे हाती घेत मृतदेहाची ओळख पटवण्यासाठी जिल्ह्यातील तसेच बाहेरील पोलीस ठाण्यांतील मिसिंग प्रकरणांची पडताळणी सुरू केली; मात्र सुरुवातीच्या २४ तासांत यश मिळाले नाही. दरम्यान, शेवगाव पोलीस ठाण्यातील एका खून प्रकरणात अटक असलेल्या आरोपीला मृतदेहाचे छायाचित्र दाखवण्यात आले. त्याने मृत व्यक्ती गदेवाडी (जि. अहिल्यानगर) येथील असल्याची माहिती दिली. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गदेवाडी येथे जाऊन चौकशी केली असता मृताचे नाव कृष्णा पंढरीनाथ धनवडे असल्याचे निष्पन्न झाले. तो मूकबधिर असल्याने तो मोबाईल वापरत नसे. पोलीस तपासात कृष्णा हा दारू आणि इतर व्यसनांच्या आहारी गेलेला असल्याचे समोर आले. तो अनेकदा न सांगता घरातून निघून बाहेर अनेक दिवस राहत असे. हिच बाब लक्षात घेता पोलिसांनी मृत कृष्णा याचे मित्र, दारु विक्रेते यांच्याकडे चौकशी केली. जावई सागर केसापुरे याचे मृत कृष्णा यांच्याशी पटत नव्हते. सागर याने मृत कृष्णा यास यापूर्वी देखील मारहाण केली असल्याचे खबऱ्याकडून पोलिसांना कळले. गोपनीय आणि तांत्रिक माहितीवरुन भाचे जावई असलेला सागर केसापुरे, त्याचा साथीदार ऋषिकेश गायकवाड आणि एका विधी संघर्ष बालिक या तिघांनी मिळून कृष्णाचा खून केल्याचे पोलिसांना समजले. त्याआधारे तिघांकडे पोलिसांनी विचारणा केली. या तिघांनी नियोजन करुन दुचाकीवरुन १३ डिसेंबर रोजी रात्री कृष्णा यांचे घर गाठले. एका खोलीत कृष्णा एकटा झोपल्याचे बघून आरोपींनी दोरीच्या सहाय्याने गळ्याला फास देऊन त्यास ठार मारले. त्यानंतर त्याचे हातपाय दोरीने बांधुन मृतदेह एका प्लास्टिक गोणीत टाकला आणि ती गोणी दुचाकीवरुन घेऊन पाटेगाव जवळील पुलावरून गोदावरी नदीत फेकून दिल्याची कुबली आरोपींनी दिल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपींना पैठण पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आलं आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक पवार करीत आहेत.

पान ८ वरून....

## लातूर महापालिका निवडणूक ...

सुविधा, स्टाँगरुम व मतमोजणी केंद्र, एक खिड्की कक्ष, निवडणुक खर्च व पर्यवेक्षण, आचार संहितेची प्रभावी अंमलबाजावणी ईत्यादी विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली.सदर बैठकीस अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त वसुधा फड, डॉ.पंजाबराव खानसोळे व सर्व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित होते.

## भाईंदरमधील इमारतीत शिरलेला...

मिरा -भाईंदर शहराच्या पूर्वेला साई निकेतन इमारत आणि सागर किरण इमारती जवळून आरएनपी मार्गे बिबट्या शहरात घुसल्याची माहिती आहे. तर रात्री बिबट्या काही ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरात बिबट्या कैद झाला आहे. बिबट्यासाठी संरक्षित जंगल आणि कांदळवन यांना संरक्षण भिंत बांधण्यात यावी आणि त्याठिकाणी झालेले अतिक्रमण जमीनदोस्त करण्यात यावे. तसेच शहराला लागून असलेल्या संजय गांधी नॅशनल पार्क परिसराच्या अतिसंवेदनशील परिसरात बांधकाम परवानग्या देऊ नये,अशी मागणी होत आहे.

## ऐतिहासिक वसई किल्ल्यात हुल्लडबाजी...

दिलेल्या माहितीत पुरातत्त्व विभागाकडून तक्रार देण्यात आलेली नाही त्यामुळे संबंधितां विरोधात एफ आय आर करण्यास अडचण निर्माण झालेली आहे विभागाने तक्रार दिल्यास संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात येईल अशी प्रतिक्रिया दिली आहे.

## पालघर जिल्ह्यातील वीटभट्टीवर...

त्यांच्या आरोग्यावर विशेष लक्ष देण्यात येत आहे. यासाठी जिल्ह्यातील ४६ प्राथमिक आरोग्य केंद्रे व १८३ सामुदायिक आरोग्य अधिकारी कार्यरत असून, महिला व बाल विकास विभागामार्फत आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. ८ तालुक्यातील साधारणतः ५१९ वीटभट्ट्यांवरील २० हजार स्थलांतरित लाभार्थ्यांच्या आरोग्य तपासणी साठी मोहीम राबवण्यात येणार आहे. तालुका आरोग्य अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी व नोडल अधिकाऱ्यांच्या समन्वयातून ही शिबिरे राबविण्यात येत असून, प्रत्येक लाभार्थ्याची तपासणी करून आवश्यकतेनुसार औषधोपचारही दिले जात आहेत. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर संतोष चौधरी व उपजिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर शशिकांत साळुंखे यांचे नियोजनात सदर उपक्रम सुरू आहे. या उपक्रमामुळे स्थलांतरित कुटुंबांच्या आरोग्यस्थितीत सुधारणा होऊन बालकांमधील कुपोषण रोखण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

## 'प्रसाद चिकित्सा' संस्थेच्या सहकार्यातून ...

सुरू असून, दुर्गम भागातील शाळांना सक्षम करण्याच्या या ध्येयाचे सर्वत्र स्वागत होत आहे. या प्रकल्पाचे लोकार्पण संस्थेचे अध्यक्ष, सचिव, दिघाशी गावचे सरपंच, शाळेचे मुख्याध्यापक आणि 'प्रसाद चिकित्सा' संस्थेचे प्रतिनिधी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. मान्यवरांच्या हस्ते फीत कापून नूतन स्वच्छतागृहाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी बोलताना मान्यवरांनी सांगितले की, मुलींची शाळेतील उपस्थिती वाढवण्यासाठी आणि आरोग्यासाठी अशा सुविधांची मोठी मदत होते. 'प्रसाद चिकित्सा'ने दिलेले हे योगदान शाळेच्या प्रगतीसाठी मैलाचा दगड ठरेल. शाळेच्या वतीने 'प्रसाद चिकित्सा' संस्थेच्या प्रतिनिधींचा शाल, श्रीफळ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. ग्रामीण भागातील शिक्षणाला बळकट करण्यासाठी संस्थेने दाखवलेली ही सामाजिक बांधिलकी कौतुकास्पद असल्याचे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले. या ऐतिहासिक क्षणी शाळेचा संपूर्ण शिक्षक वृंद, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य, ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी, शाळेचे मुख्याध्यापक यांनी 'प्रसाद चिकित्सा' संस्थेचे आभार मानले आणि त्यांच्या सहकार्यामुळेच हा प्रकल्प यशस्वी झाल्याची भावना व्यक्त केली.

## करंजपाडा नदीवर वनराई ...

क्षेत्रात लोकसहभागातून स्वच्छता अभियानही राबविण्यात आले. वाहून जाणारे पाणी अडवण्यासाठी उभारण्यात आलेल्या या मातीच्या बंधाऱ्यामुळे नदीकाठची मातीधूप मोठ्या प्रमाणात थांबणार असून नदी व तलावांची पाण्याची पातळी वाढण्यास मदत होणार आहे. ग्रामस्थांनी स्वच्छता आणि बंधारा उभारणीसाठी सक्रिय सहभाग घेतल्याची माहिती सरपंच अवनी सांबरे यांनी दिली. ग्रामपंचायतीच्या या उपक्रमाचे परिसरात कौतुक होत आहे.

## वेगवेगळ्या अपघातात दोघांचा दुर्दैवी मृत्यू

बोईसर : वाहनांच्या भरधाव वेगामुळे झालेल्या दोन अपघातांमध्ये दोन जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या अपघात प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यात आरोपींविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. वेगवेगळ्या दुचाकी अपघातात दोन जणांना आपले प्राण गमवावे लागले. मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील हालोली गावठाण पाडा येथे बाईक रायडरने महामार्ग ओलांडणाऱ्या शारदा शांताराम पानेरा (७८) या वृद्ध महिलेला जोरदार धडक दिली. दुचाकीच्या धडकेत महिलेचा जागीच मृत्यू झाला. महिलेच्या अपघाती मृत्यूप्रकरणी वसई येथील बाईक रायडर विनायक नायकर याच्या विरोधात मनोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर दुसऱ्या घटनेत जव्हार नाशिक राज्य मार्गावरील शिरपामाळ येथील वळणावर जीपने समोरून येत असलेल्या स्कुटीला जोरदार धडक दिली. या अपघातात स्कुटी चालक उमेश संजय भोये हा तरुण गंभीर जखमी होऊन त्याचा मृत्यू झाला. या अपघात प्रकरणी जीप चालक शैलेश दिवाकर सयाम याच्या विरोधात जव्हार पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

क्राईम संध्या | सोमवार दि. २२ डिसेंबर २०२५ ते रविवार दि. २८ डिसेंबर २०२५ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com | ७

# वसई-विरार महापालिका क्षेत्रातील ११ लाख मतदारांच्या हाती ११५ नगरसेवकांचे भवितव्य!




**विरार : वार्ताहर**

मागील पाच वर्षांपासून रखडलेली वसई विरार महापालिकेची निवडणूक येत्या १५ जानेवारीला पार पडणार आहे. या निवडणुकीसाठी महापालिका प्रशासन कामाला लागले असून २९ प्रभागांची अंतिम मतदार यादी जाहीर केली आहे. त्यामुळे जवळपास सव्वा अकरा लाख मतदारांच्या हाती ११५ नगरसेवकांचे भवितव्य आहे. सर्वाधिक मतदार हे प्रभाग समिती ब मध्ये येणाऱ्या प्रभाग ९ मध्ये आहेत. वसई विरार महापालिकेच्या ११५ जागांसाठी १५ जानेवारीला निवडणूक होणार आहे. पालिका क्षेत्रात २९ प्रभाग येतात. २८ प्रभागांमध्ये प्रत्येकी ४ नगरसेवक यावेळी निवडून द्यावयाचे आहेत. तर २९ व्या प्रभागातून तीन नगरसेवक निवडले जाणार आहेत. या सर्व प्रभागांसाठीची अंतिम यादी महापालिकेने जाहीर केली आहे. या यादीसाठी १ जुलै २०२५ पर्यंतची विधानसभा मतदार यादी गृहीत धरण्यात आली आहे. सुरुवातीला विधानसभा मतदारसंघनिहाय यादी फोडून महापालिका निवडणुकीसाठीची प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादी जाहीर करण्यात आली होती. त्यावरील हरकती व सूचनांनंतर ही यादी आता अंतिम करण्यात आली आहे. वसई विरार मध्ये ११ लाख २६ हजार ४०० मतदार असून त्यापैकी ६ लाख १ हजार १४१ पुरुष (५३%) तर ५ लाख २५ हजार ११३ (४७%) महिला मतदार आहेत. याशिवाय १४६ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे. यातील सर्वाधिक मतदार हे प्रभाग समिती ब नालासोपारा मधील प्रभाग ९ मध्ये आहेत त्यात ५० हजार इतकी मतदार संख्या आहे. नालासोपारा मध्ये मोडणाऱ्या प्रभाग समिती 'ब' मध्ये येत असलेल्या प्रभाग क्रमांक नऊ मध्ये सर्वाधिक मतदार म्हणजेच ५० हजार ४० इतके मतदार असून त्यात २७ हजार पुरुष व २२ हजार ९७४ महिला मतदार व ६ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे. तर सर्वाधिक कमी मतदार संख्या ही वसईच्या आय प्रभागातील प्रभाग क्रमांक २९ मध्ये २९ हजार १५३ इतकी मतदार संख्या असल्याचे पालिकेने प्रसिद्ध केलेल्या यादीतून स्पष्ट झाले आहे.

वसई विरार महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच बैठक पार पडली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त (निवडणूक) संजय हेरवाडे, अतिरिक्त आयुक्त दिपक सावंत उप-आयुक्त (निवडणूक), प्रभागनिहाय नियुक्त करण्यात आलेले निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, पोलीस विभागातील वरिष्ठ अधिकारी, प्रभाग सहाय्यक आयुक्त उपस्थित होते. या बैठकीत निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय निश्चिती, आचारसंहितेची परिणामकारक अंमलबजावणी, उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र देणे व स्विकारणे, नामनिर्देशनपत्रांची छाननी करणे, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे, मतदान केंद्रांवरील सोईसुविधा, प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी करावयाची कार्यवाही, अहवाल सादरीकरण, मतमोजणी बाबतचे नियोजन अशा विविध बाबींसंदर्भात चर्चा करण्यात आली.

## जव्हार येथे विज्ञान प्रदर्शनात साहित्य चोरी, मोडतोड व जाळपोळ

**जव्हार : वार्ताहर**



पालघर जिल्हा परिषद व पंचायत समिती जव्हार यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय ५३ वे विज्ञान प्रदर्शन बुधवार व गुरुवारी जव्हार शहरातील के. व्ही. हायस्कूल येथे मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आले होते. मात्र, या प्रदर्शनात सहभागी झालेल्या २५ टक्के विद्यार्थ्यांचे प्रकल्प, साहित्य चोरीस जाणे, मोडतोड करणे, जाळणे असे कृत्य घडल्याने बाल वैज्ञानिक पुढची प्रगती गाठण्याआधीच धाय मोकलून रडू लागल्याचे चित्र उभे ठाकले. त्यामुळे या प्रदर्शनाला गंभीर नियोजनाचा अभाव व अपुऱ्या सुरक्षेमुळे गालबोट लागले आहे. नियोजित ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक सोयी-सुविधांचा अभाव असल्याने प्रदर्शनात सहभागी झालेल्या तालुकाभरातील शालेय विद्यार्थ्यांचे विज्ञान प्रकल्प साहित्य मोडतोड, चोरी तसेच काही पेटवून देण्यात आल्याचे सहभागी विद्यार्थी विज्ञान प्रदर्शन केंद्र ठिकाणी पोहोचताच लक्षात आले. या घटनेमुळे मेहनतीने प्रकल्प तयार करणारे विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणात नाराज झाले असून अनेक मुले रडत असल्याचे भावनिक दृश्य पाहायला मिळाले. दरम्यान, या प्रकारामुळे संबंधित विद्यार्थी स्पर्धेतून बाद झाले असून त्यांचे आर्थिक नुकसानही झाले आहे. याबाबत जव्हार पंचायत समितीमार्फत विज्ञान प्रदर्शन केंद्र निवडताना कोणते निकष ठेवण्यात आले होते का?, तसेच सुरक्षेची जबाबदारी नेमकी कोणाची होती, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. विद्यार्थ्यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई कशी दिली जाणार?, तसेच या गंभीर निष्काळजीपणाची जबाबदारी कोणावर निश्चित होणार?, असे प्रश्न उपस्थित पंचायत समितीच्या शिक्षण विभागाचे शिक्षण विस्तार अधिकारी तसेच इतर कर्मचारी यांना विचारले असता, अतिशय उर्मटपणे पालकांना प्रतिक्रिया देण्यात आल्या, त्यामुळे हे प्रकरण नेमके कसे घडले? असा पालकांचा संतप्त सवाल अनुत्तरित आहे. प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषींवर कारवाई करावी व विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी होत आहे. विज्ञान प्रदर्शन केंद्र ठिकाणी विद्यार्थ्यांचे प्रकल्प नुकसान झाल्याचे समजले. त्याबाबत, शिक्षण विस्तार अधिकारी यांना चौकशी करण्यास सांगितले आहे, असे जव्हार पंचायत समिती, गटशिक्षणाधिकारी विजया टाळकुटे यांनी सांगितले.

## फेरीवाल्यांचा कचरा थेट नायगाव सोपारा खाडी पात्रात

**वसई : वार्ताहर**

नायगाव पूर्वेतील स्थानका बाहेरील रस्त्यावर विविध वस्तू आणि खाद्यपदार्थ विक्रीसाठी बसणाऱ्या फेरीवाल्यांकडून कचरा थेट सोपारा खाडीच्या पात्रात टाकून दिला जाऊ लागला आहे. दिवसेंदिवस कचरा टाकण्याचे प्रमाण वाढू लागल्याने या खाडीतील जैवविविधता धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नायगाव रेल्वे स्थानकाला जोडूनच नायगावपूर्वेकडील परिसर आहे. या भागात रस्त्याच्या कडेला मोठ्या संख्येने फेरीवाले भाजीपाला, खाद्यपदार्थ, व इतर वस्तूंची विक्री करण्यासाठी बसत आहेत. या फेरीवाल्यांची संख्या प्रचंड वाढली आहे. फेरीवाल्यांकडून भाजीपाल्याची आवरणे, प्लास्टीच्या पिशव्या, खाद्यपदार्थांचे उरले सुरले पदार्थ, प्लास्टी पिशव्या, खराब मासळी यासह इतर सर्व निघणारा कचरा कचरा कुंडीत टाकण्याऐवजी थेट खाडी पात्रात फेकून दिला जाऊ लागला आहे.



याकडे पालिकेने दुर्लक्ष केले असल्याने दिवसेंदिवस याचे प्रमाण वाढू लागले आहे. आधीच विविध प्रकारच्या कारणामुळे खाड्या प्रदूषित होत आहेत त्यातच या कचऱ्याची भर पडली आहे. त्यामुळे याचा परिणाम हा खाडीपात्रात असलेल्या जैवविविधतेवर होऊ लागला आहे. यामुळे जे नागरिक खाडी पात्रात मासेमारी करतात त्यांच्या व्यवसायावरही परिणाम होऊ लागला असल्याचे नागरिकांनी सांगितले आहे. तर दुसरीकडे काही फेरीवाले हा कचरा जागच्या जागी टाकून निघू जात आहेत. त्यामुळे ये जा करणाऱ्या प्रवाशांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. तर काही वेळा कचरा कांदळवनात ही फेकला जात असल्याने कांदळवन परिसर ही धोक्यात आला आहे. अशा प्रकारे कचरा टाकून खाडी पात्र व आजूबाजूचा परिसर प्रदूषित करणाऱ्या फेरीवाल्यांच्या विरोधात कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे. विभागीय स्वच्छता निरीक्षक यांच्या कडून पाहणी करून संबंधित ठिकाणी कारवाई करण्याच्या सूचना देण्यात येतील असे महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या अधिकाऱ्याने सांगितले आहे. दरवर्षी पावसाळ्यात वसई विरार शहर हे पाण्याखाली जाते. पाण्याचा निचरा व्हावा यासाठी दरवर्षी पालिका खाडी पात्र व नाले यांची स्वच्छता करून गाळ उपसा करण्याचे काम केले जाते.परंतु नायगाव खाडीवरील पात्रात फेरीवाल्यांकडून कचरा टाकण्याचे प्रमाण वाढत असल्याने हे पात्र तुंबून पाणी निचरा होण्याच्या मार्गात अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे.

## फरार नायजेरीयन नागरीकाकडून ५६ लाखांचा अंमली पदार्थ जप्त!

### गुन्हे शाखा कक्ष-२ वसई पथकाची कामगिरी

**नालासोपारा : वार्ताहर**

नालासोपारा येथून एका नायजेरीयन नागरीकाला ताब्यात घेऊन त्याच्याकडून ५६ लाख रुपये किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात गुन्हे शाखा कक्ष -२ वसई पथकाला यश आले आहे. आरोपी उवाके हेर्नी युचेन्ना उर्फ हेर्नी उवाचेकुवे (३८) सध्या रा. नालासोपारा पश्चिम याला गुन्हे शाखा कक्ष -२ वसई च्या पथकाने विरार पश्चिम येथील कळंब ते राजोडी परिसरातुन दि. १७ रोजी दुपारी ३.४५ वा. छापा टाकुन ताब्यात घेतले. ह्या नायझेरीयन नागरीकाच्या ताब्यातून आंफेटामाईन नावाचा २८० ग्रॅम वजनाचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला. याआधी ५ कोटी ६० लाख ४० हजार १५० रुपये किंमतीचा मेफेड्रॉन (एमडी) नावाचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेल्या तुळींज पोलीस ठाणे अभिलेखावरील गुन्हा रजि.नं. ३८४/२०२५ गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोवैद्यानिक परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ (एन.डी.पी.एस. ऍक्ट) कलम ८ (क), २१, २१ (क), २२, २९ यांसह विदेशी व्यक्ती अधि. १९४६ चा कायदा कलम १४ या गुन्ह्यातील फरार आरोपी हेंरी उचेंना युवाकवे याचा गुन्हे शाखा कक्ष -२ वसई चे अधिकारी



शोध घेत होते. फरार आरोपी हा कळंब राजोडी परीसरामध्ये लपुन बसला असल्याची खात्रीलायक गुप्त माहीती काल गुन्हे शाखा कक्ष २ वसई कार्यालयाचे सहा.फौजदार मुकेश पवार यांना मिळाली होती. आरोपीकडून आंफेटामाईन नावाचा अंमली पदार्थ व मोबाईल असा एकुण ५६ लाख १२ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्याच्या विरोधात अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यात गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोवैद्यानिक परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ (एन.डी.पी.एस. ऍक्ट) ८ (क), २१, २१(क),२२,२९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा पुढील तपास अर्नाळा सागरी पोलीस ठाण्याचे पोलिस करीत आहेत. सदरची कामगिरी पोलीस आयुक्त निकेत कौशिक, अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, पोलीस उपआयुक्त (गुन्हे) संदीप डोईफोडे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक अविराज कुराडे, सहा. पोलीस निरीक्षक सोपान पाटील, पो. उपनिरीक्षक संतोष घाडगे, पो. उपनिरीक्षक अजित गिते, सहा. फौजदार संजय नवले, मुकेश पवार, रविंद्र पवार, मनोज मोरे, चंदन मोरे, पोहवा. प्रफुल्ल पाटील, सचिन पाटील, जगदिश गोवारी, राहूल कर्पे, दिलदार शेख, दादा आडके, पोअंम. अनिल साबळे, अक्षय बांगर, मसुब. रामेश्वर केकान, सायबर शाखेचे सहा.फौज.संतोष चव्हाणांनी पार पाडली आहे.

## तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात लिटिल एंजल स्कूलची यशस्वी कामगिरी



**वाडा : वार्ताहर**

जिल्हा परिषद पालघर, पंचायत समिती वाडा (शिक्षण विभाग) यांच्या वतीने आयोजित तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन (सन २०२५-२६) दिनांक १६ व १७ डिसेंबर २०२५ रोजी झेडे. मेमन स्कूल, कुडूस येथे उत्साहात पार पडले. या विज्ञान प्रदर्शनात वाडा तालुक्यातील सर्वच शाळांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी विविध नावीन्यपूर्ण वैज्ञानिक प्रकल्प सादर करून आपली गुणवत्ता दाखवून दिली. या स्पर्धेत लिटिल एंजल इंग्लिश मिडीयम स्कूल, वाडा या शाळेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. शाळेच्या कु. मोहित सचिन मुकणे व कु. राज कपिल चुंभळे या विद्यार्थ्यांनी श्रीमती गीता शेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केलेल्या ऑइल स्कीमर या पर्यावरणपूरक व उपयुक्त प्रकल्पाला प्रथम क्रमांक प्राप्त झाला. तेल गळतीमुळे होणारे जलप्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा ठरला असून परीक्षकांकडून त्याचे विशेष कौतुक करण्यात आले. तसेच, याच शाळेच्या अद्वैत भरत बांगर व कु. अनिकेत संतोष माळी या विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. या यशामागे विद्यार्थ्यांचे परिश्रम, शिक्षकांचे मार्गदर्शन तसेच शाळा व्यवस्थापनाचे मोलाचे सहकार्य कारणीभूत ठरले. शाळेचे चेअरमन देवेंद्र भानुशाली व मुख्याध्यापिका सुमन मैनी यांनी विद्यार्थ्यांना वेळोवेळी प्रोत्साहन दिले. या यशाबद्दल शाळेतील शिक्षकवृंद, पालकवर्ग तसेच शिक्षणप्रेमींनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## गॅस सिलिंडरच्या स्फोटात दोघेजण गंभीर जखमी



**विरार : वार्ताहर**

विरार पश्चिमेतील बोळींज परिसरातील गोल्डन ओक इमारतीत गुरुवारी सायंकाळी गॅस सिलिंडरचा भीषण स्फोट होऊन आई आणि मुलगा गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. स्फोटाची तीव्रता इतकी होती की संबंधित खोलीतून घरातील वापरात येणारे साहित्य तसेच आगीच्या ज्वाळा व धुराचे लोट बाहेर पडत होते. या स्फोटात देविना पवार (वय ४२) आणि सिद्धार्थ पवार (वय १९) हे दोघे गंभीर जखमी झाले असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. स्फोटानंतर काही क्षणांतच आगीने रौद्र रूप धारण केले. आग आणि धुरामुळे इमारतीतील रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच महापालिकेच्या अग्निशमन दलाचे जवान तातडीने घटनास्थळी दाखल होऊन तत्परतेने आग आटोक्यात आणत दुर्घटना टळली. जखमींना तात्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत आता खानिवली ग्रामपंचायत हद्दीत दर बुधवारी स्वछता अभियान



**वाडा : वार्ताहर**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत ग्रामपंचायत खानिवली मध्ये दर बुधवारी स्वच्छता अभियान आयोजित केले जाते. लोकसहभागातुन ग्राम स्वच्छता करणे गावातील लोकांनी अंगीकारणे हा उद्देश ठेवुन एक आदर्श गाव तयार करण्याची भुमिका ग्रामपंचायतीने घेतली आहे. ग्रामपंचायत मध्ये गोखले एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब वर्तक कॉलेज बोरिवली यांचा एन.एस.एस. कॅम्प आला आहे. या कॅम्प मधील मुलांच्या माध्यमातुन विविध उपक्रम ग्रामपंचायत मध्ये राबवीत आहे. मंगळवारी (दि.१६) मोखई नदीवर वनराई बंधारा बांधण्यात आला. तसेच बुधवारी (दि.१७) गाव स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या मध्ये संपुर्ण गाव स्वच्छ करण्यात आला.एन.एस.एस. मधील मुले श्रमदान अतिशय तळमळतेने आणि निष्ठेने करीत आहेत. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान यशस्वीपणे राबवून गावाला बक्षीस मिळवुन देण्याचा मानस सरपंच भरत हजारे यांनी व्यक्त केला. यावेळी उपसरपंच सागर पाटील, ग्रा.पं.सदस्य प्रेरणा पोटिंदा, सारिका पाटील, ग्रामपंचायत अधिकारी शशिकांत ठाकरे, एन.एस.एस. विभागाचे प्रमुख डॉ.चंद्रकांत पाटील उपस्थित होते.

## मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील 'ब्लॅक स्पॉट'मुळे अपघातांमध्ये मोठी वाढ!

**पालघर : वार्ताहर**

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग हा देशातील अत्यंत महत्त्वाचा आणि वर्दळीचा दळणवळण मार्ग मानला जातो. मात्र या महामार्गावर सातत्याने घडणार्या भीषण अपघातांमुळे तो आता 'मृत्यू मार्ग' ठरत असल्याचे चित्र समोर येत आहे. महामार्गावरील अनेक ठिकाणे 'ब्लॅक स्पॉट' म्हणून ओळखली जात असून, रस्त्यांच्या बांधणीत वाहनांच्या वेगाशी संबंधित गतिज ऊर्जेचा पुरेसा विचार न केल्याने अपघातांची मालिका सुरूच आहे. गतिज ऊर्जेचा थेट संबंध वाहनाच्या वेगाशी असतो. वेग जितका अधिक, तितकी अपघाताच्या वेळी होणारी हानी प्रचंड वाढते. मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील अनेक ठिकाणी तीव्र वळणे, अचानक उतार-चढाव, अपुरी दृष्यमर्यादा, अयोग्य साईनबोर्ड्स आणि अपुरे वेग नियंत्रण उपाय आढळतात. या त्रुटींमुळे चालकांचा वाहनावरील ताबा सुटून गंभीर अपघात घडत असल्याचे सातत्याने दिसून येत आहे. विशेषतः अवजड वाहने तसेच खासगी लक्झरी वाहनांचा वेग मोठ्या प्रमाणात असल्याने रस्त्याची रुंदी, वळणाचा त्रिज्या , ब्रेकिंग अंतर आणि घर्षण गुणांक यांचा वैज्ञानिक अभ्यास न झाल्यास अपघात अटळ ठरतात. मात्र महामार्गाच्या बांधणीदरम्यान प्रवासाचा वेग वाढवण्यावर भर देण्यात आला. तर क्रॅश बॅरियर्स, रंबल स्ट्रिप्स, वैज्ञानिक वळणे, वेग मर्यादा दर्शविणारे फलक याकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप होत आहे.



दरम्यान २०२१ च्या सर्वेक्षणानुसार पालघर जिल्ह्यातील एनएच-४८ च्या काही भागात ११ ब्लॅक स्पॉट्स ओळखले गेले होते. ठोस कारवाई न झाल्याने एप्रिल ते ऑक्टोबर २०२२ या कालावधीत २७१ अपघातांत १०९ जणांचा मृत्यू झाला. २०२२ मध्ये घोडबंदर ते दापचेरी दरम्यानच्या सुमारे १०० किमीच्या पट्ट्यात, जिथे उद्योगपती सायरस मिस्त्री यांचा अपघात झाला, त्या वर्षी २६२ अपघातांमध्ये किमान ६२ मृत्यू व १९२ जखमी झाले.२०२३ मध्ये पालघर ब्लॅक स्पॉट भागात १८२ गंभीर अपघातांत १०६ मृत्यू २०२४ मध्ये ७४ गंभीर अपघातांत ८६ मृत्यू नोंदवले गेले. २०२५ च्या पहिल्या सहा महिन्यांतच ५० हून अधिक गंभीर अपघातांत ३० पेक्षा जास्त मृत्यू, तर काही अहवालांनुसार २०२५ मध्ये संपूर्ण महामार्गावर २३८ अपघातांत १३१ नागरिकांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

## समाजवादी पार्टी बहुमतात येईल, भिवंडीतील जनतेचा कॉंग्रेस वरील विश्वास उडाला -अजय यादव

**भिवंडी : वार्ताहर**



भिवंडी शहराचा विकास समाजवादी पार्टीच्या माध्यमातूनच होऊ शकतो. म्हणून भिवंडी शहरात समाजवादी पक्षाकडून उमेदवारी मागणाऱ्यांची गर्दी वाढलेली आहे. पक्षाकडून स्वच्छ चारित्र्याचे उमेदवार देणार असल्याने भिवंडी महानगरपालिकेत समाजवादी पार्टी पूर्ण बहुमतात सत्तेवर येऊन प्रथमच महापौर समाजवादी पार्टीचा असेल असा विश्वास समाजवादी पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष भिवंडी निवडणूक प्रभारी अजय यादव यांनी व्यक्त केला आहे. कॉंग्रेस पक्षाला पूर्ण बहुमत देऊन ही तेथे झालेल्या बंडखोरी नंतर जनतेचा कॉंग्रेस वरील विश्वास उडाला असून समाजवादी पार्टीवर भिवंडीकर जनतेचा विश्वास अधिक असेल असे सांगत भिवंडी पूर्व विधानसभेमध्ये समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख यांना ५२ हजारांचे मताधिक्य मिळाले. त्यामुळे भाजपाचे सुद्धा आव्हान भिवंडी शहरात समाजवादी पक्षासमोर असणार नाही असे शेवटी अजय यादव यांनी स्पष्ट केले.

# वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील ५२ हजार दुबार मतदारांपैकी २४ हजार व्यक्तींचे पत्ते सापडले -आयुक्त सूर्यवंशी



**विरार : वार्ताहर**

आगामी वसई विरार महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आज १९ डिसेंबर रोजी महापालिका आयुक्त सूर्यवंशी यांनी पालिका मुख्यालयात पत्रकार परिषद घेतली. त्यांनी पत्रकारांशी संवाद साधत त्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. राज्य निवडणूक आयोगाने दि. १५ डिसेंबर, २०२५ रोजी राज्यातील २९ महानगरपालिकांचा निवडणूक कार्यक्रम जाहिर केला आहे. त्यानुसार वसई-विरार शहर महानगरपालिका, सार्वत्रिक निवडणूक -२०२६ चा कार्यक्रम दि. १७ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आला असून आमची तयारी झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी अति. आयुक्त दीपक सावंत व संजय हेरवाडे, पोलीस उपआयुक्त परि -२ च्या पौर्णिमा चौगुले श्रींगी, पोलीस उपआयुक्त परि -२ चे सुहास बावचे आदी उपस्थित होते. २९ प्रभागामध्ये ११५ असून सध्याच्या नऊ प्रभाग समिती कार्यालयामध्ये ३ ते ४ वॉर्ड प्रमाणे निवडणूक कार्यालय कार्यान्वित केली आहेत. एकूण मतदार संख्या ११,२६,४०० इतकी असून यामध्ये स्त्रिया ५,२५,११३, पुरूष ६,०१,१४१, इतर १४६ अशी मतदार संख्या आहे. एकूण २९ प्रभाग आणि ११५ जागासाठी एकूण मतदान केंद्रे १३७४ असून निवडणूक कर्मचारी संख्या ७४९४ + राखीव ७५० कर्मचारी काम पाहतील. आता पर्यंत ५२ हजार दुबार मतदार सापडले आहेत. त्यापैकी २४ हजार मतदारांचे पत्ते मिळाले. त्यांना संपर्क साधून अवगत केले जात असून त्यांना मतदान करण्यात अडचणी नाहीत. मात्र इतरांचे पत्ते सापडत नाहीत असे आयुक्त म्हणाले. वसई-विरार शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ अंतर्गत ९ प्रभाग कार्यालये स्थापन करण्यात आली असून ९ निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. सार्वत्रिक निवडणूक आचारसंहितेच्या अनुषंगाने कार्यक्षेत्रातील होर्डिंग्स व बॅनरवर कार्यवाही करण्यात आली आहे. निवडणूक कार्यालय व मतदान केंद्रांच्या ठिकाणी आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करणे, निवडणूक कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करणे, निवडणूक साहित्य वाटप, खान-पान व्यवस्था, स्ट्रॉग रुम व्यवस्था, कर्मचारी प्रशिक्षण इत्यादी सर्व कामांसाठी नोडल अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या आहेत.

राज्य निवडणूक आयोगाकडून निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेशान्वये 'महानगरपालिकास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती' आज दि. १९ गठीत करण्यात आली आहे. निवडणूक कालावधीत महानगरपालिका क्षेत्रात प्रवेश करावयाच्या मार्गावर व रेल्वे स्थानकांच्या ठिकाणी 20 FST पथके तसेच प्रभागनिहाय प्रत्येकी एक या प्रमाणे 9 FST व 9 VST पथकांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे पालिका आयुक्तांनी माध्यमांना सांगितले. संवेदनशील ठिकाणी विशेष लक्ष ताजेवण्याची व्यवस्था केली आहे. असामाजिक तत्व व लोकांवर पोलिसांची करडी नजर असेल. ऐशी लोकांवर प्रतिबंधक कारवाई केली असून आणखी कारवाई सुरु असल्याचे पोलीस उपआयुक्त सुहास बावचे यांनी सांगितले. निवडणूक काळात पत्रकारांवर देखील प्रशासनाची करडी नजर राहील. पेड न्यूज आणि धार्मिक द्वेष पसरवणाऱ्या किंवा कुणाच्या चारित्र्य हननच्या बातम्या पसरवण्याचा प्रयत्न झाल्यास कारवाईला सामोरे जावे लागेल.

# लातूर महापालिका निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची बैठक संपन्न



**लातूर : वार्ताहर**

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. या अनुषंगाने मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या. या अधिकाऱ्यांची आढावा बैठक संपन्न झाली. लातूर शहर महानगरपालिका लातूर सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजी नगर यांनी एकूण ६ उपजिल्हाधिकारी संवर्गातील निवडणूक निर्णय अधिकारी व ६ तहसीलदार संवर्गातील सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांची निवड करण्याचे आदेश दिले होते.त्यानुसार शरद झाडके, उपविभागीय अधिकारी निलंगा, मंजुषा लटपटे, उपविभागीय अधिकारी अहमदपूर, रोहिणी नऱ्हे, उपविभागीय अधिकारी लातूर अविनाश कोरडे उपविभागीय अधिकारी औसा-रेणापूर सुशांत शिंदे उपविभागीय अधिकारी, उदगीर व संदीप कुलकर्णी उपजिल्हाधिकारी (पुनर्वस) यांच्या नियुक्ती करण्यात आली आहे. शहरातील प्रत्येक तीन प्रभागांसाठी एक याप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी नेमण्यात आले आहेत.प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकार्यायसोबत तीन सहाय्यक अधिकाऱ्यांची नियुक्तीही करण्यात आलेली आहे. या बैठकीत निवडणुकीच्या अनुषंगाने तयारी बाबत माहिती घेण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय निहाय आदेश तयार करणे,राजकीय पक्ष व पत्रकारांच्या बैठकी आयोजित करणे, निवडणूक कामासाठी कर्मचारी नेमणुक करणे, कर्मचारी प्रशिक्षण, मतदान केंद्रावरील सोयी ...पान ६ वर

# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत वाड्यातील शाळा प्रथम



**वाडा : वार्ताहर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा अंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा-२ सन २०२४-२५ या राज्यस्तरीय स्पर्धेत पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील 'गुरुकुल ग्लोबल स्कूल' ने खासगी गटात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या उपक्रमांतर्गत जिल्हास्तरीय मूल्यांकन समिती द्वारे विविध स्तरावर शाळेची १५० गुणांसाठी तपासणी करण्यात आली. वाडा तालुक्यातील सर्व शाळांची केंद्र स्तरीय, तालुका स्तरीय तसेच शिक्षण विभाग, पंचायत समिती अशा वेगवेगळ्या स्तरावर तपासणी होऊन सर्वामध्ये 'गुरुकुल ग्लोबल स्कूलने' सर्वोत्तम गुणांकन प्राप्त करत प्रथम क्रमांक पटकवला. सदर उपक्रमासाठी शाळेचे संस्थापक योगेश गंधे यांच्या नेतृत्वाखाली शाळेचे मुख्याध्यापक रसिक पाटील, उपमुख्याध्यापिका रिया लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षकांनी उपक्रमांतील विविध बाबींवर लक्ष देऊन अनेक विद्यार्थीभिमुख कार्यक्रमाची अंमलबजावणी केली. या उपक्रमात केंद्रप्रमुख रविकांत गायकवाड, विस्तार अधिकारी उमेश सातपुते, गटशिक्षण अधिकारी जयवंत कामडी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# भाईंदरमधील इमारतीत शिरलेला बिबट्या ८ तासानंतर जेरबंद



**मिरा-भाईंदर : वार्ताहर**

भाईंदर पूर्वेच्या स्वामी नारायण मंदिर रोड परिसरातील पारिजात इमारतीच्या बी-विंग मधील १०१ क्रमांकाच्या घरात बिबट्या शिरला होता. त्यात घरातील तीन जणांवर त्याने हल्ला केला. यात एक २३ वर्षीय मुलगी गंभीर जखमी झाली आहे. तर इतर दोन जण किरकोळ जखमी झाले आहेत. तर बिबट्याने इमारतीमध्ये घुसविण्यापूर्वी अजून चार जणांवर हल्ला केला होता.शुक्रवारी सकाळी साडेसात वाजल्यापासून बिबट्या इमारतीच्या परिसरात होता. शेवटी तो एका घरात घुसला.त्याला पकडण्यासाठी गुंगीचे औषध देण्यात आले.अखेर त्याला आठ तासानंतर त्याला जेरबंद करण्यात प्रशासनाला यश आले आहे. त्याची रवानगी वन विभागाच्या पिंजर्यात संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात करण्यात आली आहे. बिबट्याने इमारतीत अंजली मुकेश टाक (वय २३ वर्ष ), खुशी मुकेश टाक (वय १९ वर्ष), भारती टाक (वय ५५ वर्ष), यांच्यावर हल्ला केल. तर इमारत परिसरात असलेल्या प्रकाश यादव (वय ५० वर्ष), श्याम सहानी (वय १९ वर्ष), दिपू भौमिक (वय ५२ वर्ष), छगनलाल बागरेचा (वय ४८ वर्ष )हे बिबट्याच्या हल्ल्यात जखमी झाले आहेत, त्यांच्यावर भाईंदर पश्चिमेच्या पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यात सर्वात जास्त गंभीर अंजली टाक या आहेत. मिरा भाईंदर शहरात यापूर्वी सुद्धा अनेक वेळा भाईंदर पश्चिमेच्या शिवसेना गल्ली, तारोडी, डोंगरी आणि मिरारोड पूर्वेच्या काशीमिरा, माशाचा पाडा परिसरात बिबटे घुसल्याची माहिती आहे. त्यांना त्या त्या वेळी वन विभागाच्या मदतीने रेस्क्यू करण्यात आले होते. तर सदरील घटनेची माहिती मिळताच सकाळी साडेनऊ वाजता बिबट्या रेस्क्यू करण्यासाठी ऑपरेशन सुरू करण्यात आले. त्यानंतर दुपारी अडीच वाजता त्याला बेशुद्ध करण्यात आले आणि त्यानंतर तीन वाजता त्याला वन विभागाच्या पिंजरा असलेल्या ॲम्ब्युलन्समध्ये सलाईन लावून नेण्यात आले. सदरची रेस्क्यू कारवाईही पालिका, पोलीस, अग्निशमन विभाग व वन विभागांनी एकत्रित केली आहे. यावेळी मंत्री प्रताप सरनाईक, आमदार नरेंद्र मेहता, पालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा, अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, मिरा भाईंदरचे सर्व पोलीस ठाण्याचे प्रमुख व अपर तहसीलदार निलेश गौंड, उपवनसंरक्षक सचिन रेपाल व मुख्य अग्निशमन अधिकारी डॉ. प्रकाश बोराडे हे उपस्थित होते. ...पान ६ वर

# ऐतिहासिक वसई किल्ल्यात हुल्लडबाजी; चित्रीकरणात पुरातन वस्तूंना नुकसान



**वसई : वार्ताहर**

ऐतिहासिक वसई किल्ल्यात वेब सिरीज व चित्रपटाच्या चित्रीकरणाच्या युनिट्सने मागील काही काळात प्रेमान घातले आहे पुरातत्त्व विभागाच्या अधिनियमानुसार येथील वास्तूंना नुकसान न पोहोचवून सुरू असलेल्या चित्रीकरण विरोधात वसईतील इतिहास प्रेमीनी शुक्रवारी पुरातत्व विभागाच्या अधिकाऱ्यांना संपर्क साधून तक्रारी केल्या.

अधिक माहितीनुसार, वसईतील ऐतिहासिक किल्ल्यात फ्रान्सिस्कन चर्चमधे चित्रपटाचे चित्रीकरण सुरू होते या दरम्यान आवश्यक नियमावली न पाळून शिलालेखा वरती चूल लावून अन्नपदार्थ शिजवत असल्याचे आढळून आले. या बरोबरच या ऐतिहासिक वास्तूत विविध ठिकाणी सेट्स उभारून या वास्तूस हानी पोहोचवण्याचा प्रयत्न केला. शुक्रवारी सकाळी काही महिला कलाकार अर्ध नग्न अवस्थेत येथे धूम्रपान करीत असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे इतिहास प्रेमींमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी पसरली आहे. यापूर्वी सदर ठिकाणी अशाच स्वरूपाची घटना घडली होती. कांतारा टू या चित्रपटाचे चित्रीकरण सुरु होते. त्यावेळी याच पुरातन वास्तुत मोठ्या प्रमाणात कचरा करण्यात आला. पुरातत्व विभागावरती मोठ्या प्रमाणात टीका झाली होती. त्यानंतर विभागाला खडबडून जाग आली होती. याबाबत पुरातत्व विभागाचे अधिकारी कैलास शिंदे यांना विचारणा केली असता शुक्रवारच्या घडलेल्या घटने संदर्भात आपण पोलीस तक्रार देणार असून संबंधितांविरोधात एफ आय आर दाखल करण्यासाठी सूचना देण्यात आल्याची माहिती दिली. वसई पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण घाडीगावकर यांनी ...पान ६ वर

# पालघर जिल्ह्यातील वीटभट्टीवर काम करणाऱ्या स्थलांतरित लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी शिबीर



**पालघर : वार्ताहर**

पालघर जिल्ह्यातील वीटभट्टी व बांधकाम क्षेत्रात कार्यरत स्थलांतरित कामगार व त्यांच्या कुटुंबीयांच्या आरोग्य सुरक्षेसाठी जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद मनोज रानडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे यांचे मार्गदर्शनात व जिल्हा प्रशासन आरोग्य व महिला बालविकास विभाग महसूल विभाग यांच्या समन्वयातून मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियाना अंतर्गत दर महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी नियमित आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत पालघर तालुक्यातील चहाडे व कोकणेर येथील वीटभट्टी परिसराला जिल्हा कार्यक्रम अधिकारी व्यंकटराव हुंडेकर आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मनरेगा) अतुल पारसकर तसेच सर्व बालविकास प्रकल्प अधिकारी तसेच तालुका आरोग्य अधिकारी यांनी भेट देऊन स्थलांतरित लाभार्थ्यांच्या आरोग्य सेवांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी गरोदर माता, स्तनदा माता तसेच ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून लाभार्थ्यांना पोषण आहार, पूरक सेवा व आरोग्यविषयक मार्गदर्शन देण्यात आले. तसेच महा-चढड पवर लाभार्थ्यांची नोंद घेऊन ती अद्ययावत ठेवण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हा कार्यक्रम अधिकारी व्यंकटराव हुंडेकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित कामगार वास्तव्यास असल्याने ...पान ६ वर

# 'प्रसाद चिकित्सा' संस्थेच्या सहकार्यातून दिघाशीच्या अमृत पाटील हायस्कूलमध्ये नूतन स्वच्छतागृहाचे उद्घाटन

## ग्रामीण भागातील १३ शाळांना लाभ; तर ४ शाळांचे काम प्रगतीपथावर



**विरार : वार्ताहर**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे आरोग्य जपण्यासाठी आणि शाळेत स्वच्छतेचे वातावरण निर्माण करण्यासाठी दिघाशी येथील अमृत पाटील हायस्कूलने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. 'प्रसाद चिकित्सा' या सेवाभावी संस्थेच्या विशेष सहकार्यातून शाळेत उभारण्यात आलेल्या अद्ययावत नूतन स्वच्छतागृहाचा उद्घाटन समारंभ अत्यंत उत्साही वातावरणात संपन्न झाला. 'प्रसाद चिकित्सा' संस्थेने केवळ आरोग्यच नव्हे, तर शैक्षणिक क्षेत्रातही आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. विद्यार्थ्यांच्या मूलभूत गरजा ओळखणे आणि त्या पूर्ण करणे ही काळाची गरज आहे, हे ओळखून संस्थेने आतापर्यंत जिल्ह्यातील १३ शाळांना स्वखर्चातून स्वच्छतागृहे बांधून दिली आहेत. सध्या ४ शाळांमध्ये हे काम युद्धपातळीवर ...पान ६ वर

# वाडा येथे वन डे ब्युटी पार्लर वर्कशॉप'



**वाडा : वार्ताहर**

महिलांना स्वावलंबी व आत्मनिर्भर बनविण्याच्या उद्देशाने उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशन (महिला शिक्षण व सक्षमीकरण मोहीम) यांच्या वतीने वाडा येथे वन डे ब्युटी पार्लर वर्कशॉपचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत वाडा परिसरातील अनेक महिला व युवतींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या प्रशिक्षणात सौंदर्योपचार, मेकअप, हेअरस्टाईल, त्वचा निगा आदी विषयांवर प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात आले. अल्प खर्चात घरबसल्या व्यवसाय कसा सुरू करता येईल, ग्राहकांशी संवाद, तसेच स्वयंरोजगाराच्या संधी याबाबतही सहभागी महिलांना माहिती देण्यात आली. कार्यशाळेमुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढला असून आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेने पाऊल टाकण्याची प्रेरणा मिळाल्याचे सहभागी महिलांनी सांगितले.

# करंजपाडा नदीवर वनराई बंधारा; वाडा तालुक्यातील हमरापूर ग्रामपंचायतीचा पुढाकार




**वाडा : वार्ताहर**

पाणी आडवा, पाणी जिरवा या संकल्पनेचा प्रभावी वापर करत वाडा तालुक्यातील हमरापूर ग्रामपंचायतीच्या पुढाकारातून करंजपाडा नदीजवळ पहिला मातीचा वनराई बंधारा उभारण्यात आला आहे. योग्य नियोजन आणि लोकसहभागातून हा बंधारा बांधण्यात आला असून त्यामुळे पावसाळ्यात वाया जाणारे हजारो लिटर पाणी अडवून जमिनीत मुरवण्यास मदत होणार आहे. या बंधाऱ्यामुळे शेतीसाठी आवश्यक असलेल्या पाण्याची उपलब्धता वाढणार असून भाजीपाला लागवडीसाठी मोठा फायदा होणार आहे. तसेच बंधाऱ्यात साठवलेले पाणी वन्यजीव आणि गुरांसाठी पिण्याच्या पाण्याचा महत्त्वाचा स्रोत ठरणार आहे. पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी वनराई बंधारे उपयुक्त ठरत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. मुख्यमंत्री समृद्धी पंचायतराज अभियान व माझी वसुंधरा अभियान ०.६ कार्यक्रमांतर्गत हमरापूर ग्रामपंचायत ...पान ६ वर